दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे
* (आष्टी) वर्धा * शुक्रवार, दि.१७ डिसेंबर २०२५ * वर्ष ३ रे * अंक ११२ * पृष्ठ ६ * मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

वाहन चोरी करणारे दोघे अटकेत; आठ दुचाकी जप्त

पिंपरी : गुन्हे शाखेने वाहन चोरी करणाऱ्या दोघांना अटक केली असून, त्यांच्याकडून सहा लाख ५५ हजार रुपये किमतीच्या आठ दुचाकी जप्त केल्या आहेत. रफिक उमर जमादार (वय ३७, रा. मोशी), नीलेश मनोहर गायकवाड (वय ३०, रा. चिखली) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, चिखली पोलीस ठाण्यात वाहन चोरीचा एक गुन्हा दाखल आहे. त्या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखेकडून केला जात होता. सराईत गुन्हेगार रफिक आणि नीलेश यांनी चोरी केलेल्या दुचाकी विक्री करण्यासाठी केएसबी चौक आणि एमआयडीसी ब्लॉक दोन येथे लपवून ठेवल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी दोघांना अटक केली. त्यांच्याकडून नऊ दुचाकी जप्त केल्या. त्यांनी चिखली, पिंपरी, भोसरी, चाकण, शिवाजीनगर, निगडी पोलीस ठाण्यांतील हद्दीत केलेले वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

'स्टार्टअप्स'साठीचे नवीन धोरण देशातील सर्वाधिक आधुनिक ठरेल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





सिडबी (एघ्ॐघ्) कडून स्टार्टअप्ससाठी दोनशे कोटी रुपयांची तरतूद

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : काळाची गरज ओळखून स्टार्टअप्स धोरणाचा नवीन मसुदा तयार केला आहे. उद्योजकांना सूचनांसाठी हा मसुदा उपलब्ध करून देण्यात आला असून हे देशातील आधुनिक धोरण ठरणार आहे. या माध्यमातून राज्यात नाविन्यता शहराची स्थापना करण्यात येणार आहे. तसेच सिडबी (स्मॉल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया) कडून स्टार्टअप्ससाठी दोनशे कोटी रुपयांची तर प्रत्येक प्रादेशिक विभागासाठी तीस कोटी रुपयांची तरतूद करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

बांद्रा-कुर्ला संकुल येथील जिओ वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत राज्य नाविन्यता सोसायटीच्यावतीने एम्पॉवरींग इनोव्हेशन, एलिव्हेटिंग महाराष्ट्र (स्ंज्दैीग्हु घ्हहर्दर्नूंदह,र्तिंर्नूंहु र्शेंर्ष्टू) या संकल्पनेवर आधारित 'राष्ट्रीय स्टार्टअप्स दिवस' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते कृत्रिम बुद्धीमत्ता (ीघ) तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दीप प्रज्वलन झाले.

कार्यक्रमात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील, आयुक्त प्रदीपकुमार डांगे, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सतीश सूर्यवंशी, मेरीको लिमिटेडचे अध्यक्ष हर्ष मारीवाला, अपग्रेड अँड स्वदेस फाऊंडेशनचे सहसंस्थापक रॉनी स्क्रूवाला, नायकाच्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी फाल्गुनी नायर, स्ट्राइड व्हेंचर्स आणि स्ट्राइडवनचे संस्थापक इशप्रीत सिंग गांधी, आयआयटीचे माजी विद्यार्थी कल्याण चक्रवर्ती, गो इंडियाच्या व्यवस्थापकीय संचालक इप्सिता दासगुप्ता, महाराष्ट्रासह देशभरातील तंत्रज्ञान, कृषी, सेवा क्षेत्र, औषधनिर्माण तसेच पर्यटन अशा विविध क्षेत्रांतील एक हजार स्टार्टअप्स या कार्यक्रमात उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, नवं उद्योजक आणि महिला उद्योजकांच्या नवकल्पना सक्षम करून महाराष्ट्राची उन्नती करण्यात येणार आहे. देशात स्टार्टअप्स सुरू झाले तेव्हा ४७१ स्टार्टअप्स होते, आज देशात एक लाख ५७ हजार स्टार्टअप्स झाले आहेत. राष्ट्रीय स्टार्टअप्स दिनानिमित्त अभिमानाने सांगावेसे वाटते की, महाराष्ट्र केवळ भारताच्या स्टार्टअप्स क्रांतीत सहभागी नाही तर त्याचे नेतृत्व करत आहे. राज्यात २६ हजार स्टार्टअप्स आहेत. देशात सर्वात जास्त महिला संचालक असलेले महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. स्टार्टअप्समध्ये महाराष्ट्र पहिल्या सात राज्यात आहे.

उद्योजक, दूरदर्शी गुंतवणूकदार, धोरणकर्ते, इन्क्युबेटर्स, विद्यापीठे हे उद्योग क्षेत्रातील बदलाचे प्रणेते आहेत. 'इज ऑफ डूईंग' बिझनेसमुळे उद्योग कमी वेळात सुरू करण्यामध्ये पारदर्शकता आली आहे. गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात पहिला आहे. भविष्यातही मानवी हस्तक्षेप न ठेवता पारदर्शक पद्धतीने उद्योजकांना राज्यात शासना बरोबर उद्योग सुरू करण्याची संधी प्राप्त करून दिली जाणार आहे. भांडवली सहभागाच्या दृष्टीने मुंबई आघाडीवर असून, पुणे तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचे केंद्र आहे. आपली टियर-२ आणि टियर-३ शहरे महाराष्ट्राच्या विकासात मोठा हातभार लावत आहेत. नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि कोल्हापूर ही शहरे स्टार्टअप्सना प्रोत्साहन देत आहेत आणि इकोसिस्टम निर्माण करतात, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

विद्यापीठे आणि इन्क्युबेटर्स महाराष्ट्राच्या नवकल्पना स्टार्टअप्सला बळकटीकरण देणाऱ्या संस्था आहेत. ग्रामीण भागातील नवकल्पना असलेल्या तरुणांचा उद्योगात सहभाग वाढवणार असून, उद्योजकांना मार्गदर्शन, नेटवर्किंग, कायदेशीर सहाय्य इत्यादी सेवा देणाऱ्या इन्क्युबेटर्सना स्टार्टअप्स सुरू करण्यासाठी सहकार्य करण्यात येणार आहे. शासकीय आणि खासगी विद्यापीठे या भविष्यातील स्टार्टअप्सना बळकटीकरण देणाऱ्या संस्था आहेत. विद्यापीठे आणि इन्क्युबेटर्स हे रोजगार निर्माण करणारे घटक असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

'ए आय' स्टार्टअप्सचे सक्षमीकरण करून उत्कृष्टतेचे केंद्र बनतील. एआय हे तंत्रज्ञानातील भविष्य असून स्टार्टअप्ससाठी मोठे योगदान देणारे ठरणार आहे. यामुळे केवळ उद्योगाच्या संधी नाही तर रोजगाराच्या संधीही निर्माण होणार आहेत. राज्याला स्टार्टअप्समध्ये आघाडीवर आणण्यासाठी राज्य शासनासोबत काम करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी उपस्थित उद्योजकांना केले.

महाराष्ट्र स्टार्टअप्सची राजधानी : मंत्री मंगलप्रभात लोढा

कौशल्य विकास मंत्री श्री. लोढा म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशात कौशल्य विकास विभाग सुरू करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात कौशल्य विकास विभागाला गती दिली. राज्यातील स्टार्टअप्सला जगात पुढे नेण्यासाठी मुख्यमंत्री श्री. फडणवीस प्रयत्नशील आहेत. जगात देशाला नंबर एक बनविण्यासाठी सर्वांचे प्रयत्न आवश्यक आहेत. सर्व स्टार्टअप्स देशाला पुढे नेण्यासाठी नक्कीच प्रयत्न करतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

राज्यात सर्वाधिक महिला स्टार्टअप्स : फाल्गुनी नायर

'नायका'च्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी फाल्गुनी नायर म्हणाल्या की, महिलांनी उद्योगात आघाडीवर येण्यासाठी शासकीय नियमांचे कोणतेही अडथळे नाहीत. उद्योगाच्या अनेक संधी शासनामार्फत उपलब्ध आहेत. मुंबईसह महाराष्ट्रात महिला सुरक्षित असल्याने महिलांचे सक्षमीकरण होत आहे. महाराष्ट्र हे स्टार्टअप्स कॅपिटल असून त्याचा राज्यातील महिलांनी नक्की लाभ घ्यावा, असेही सांगितले.

यावेळी डिजिटल मीडिया सेंटर ऑफ एक्सलन्स आयटीआय गोवंडीचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन झाले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्टार्टअप्स विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.

कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील यांनी आभार मानले.

कार्यक्रमास कौशल्य विकास सोसायटीचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल सोनवणे, राज्य नाविन्यता सोसायटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विकास नाईक, व्यवस्थापक अमित कोठावडे उपस्थित होते. सूत्रसंचालन अवाना दुबाश, राखी तांबट यांनी केले.

'आर्टी' मध्ये ८५ टक्के सवलतीत विक्रीसाठी पुस्तके उपलब्ध

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई दि. १६ : महागडी पुस्तके जर आपणाला शंभर- दीडशे रुपयात मिळाली तर आश्चर्य वाटेल, पण हे खरे आहे. नव्याने स्थापन झालेल्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत असणाऱ्या अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी) या संस्थेने महापुरुषांचे विचार सर्वदूर पोहोचवण्याचा उपक्रम हाती घेतला असून, ८५ टक्के सवलतीत ही पुस्तके आर्टीच्या कार्यालयात उपलब्ध असल्याची माहिती आर्टीचे व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे यांनी दिली. देशातील अनेक महापुरुषांनी पुस्तकांच्या माध्यमातून आपले विचार समाजापर्यंत पोचविण्याच काम केले. त्यांचे विचार नवीन पिढीपर्यंत घेऊन जाण्यासाठी बार्टीचे महासंचालक श्री. वारे आणि निबंधक इंदिरा आस्वार यांच्या संकल्पनेतून आर्टी संस्थेने महापुरुषांच्या पुस्तकांवर ८५ टक्के सवलत देण्याचा अभिनव उपक्रम सुरु केला आहे.

भारताचे संविधान, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतीराव फुले, अण्णा भाऊ साठे यांचे खंड आणि त्यांच्यावर लिहिलेली मराठी, इंग्रजी भाषेतील पुस्तके विक्रीसाठी ठेवण्यात आली आहेत. सामाजिक, राजकीय, खासगी, शासकीय आणि शैक्षणिक संस्था तसेच प्रत्येकांनी संग्रहित ठेवावे, असे हे ग्रंथ या ठिकाणी उपलब्ध आहेत.

पुस्तकाची मूळ किंमत व कंसात सवलतीत दर पुढील प्रमाणे भारताचे संविधान ४५० रुपये (६३), शूद्र पूर्वी कोण होते? ३०० (४५), बुद्ध आणि त्यांचा धम्म ४०० (६०), डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र चांगदेव खैरमोडे सेट ४ हजार (६००), समग्र आंबेडकर चरित्र बो. सी. कांबळे सेट २५०० (३७५), फकिरा १६० (२४), फकिरा इंग्रजी अनुवाद २५०० (३७५), अण्णाभाऊंची दर्दभरी दास्तान ४८० (७२), राजर्षी शाहू रयतेच्या राज्याचे चित्रमय चरित्र १५०० (२२५), साहित्यसम्राट १५० (२३), स्वराज्य ते स्वातंत्र्य आणि समता १२० (१८), कर्तृत्व आणि व्यक्ति महत्त्व. ११०० (१६५). एकूण किंमत ११ हजार ५२६ रुपये किमतीची पुस्तके सवलतीच्या दरात १७३० रुपयात उपलब्ध होणार आहेत. नोव्हेंबर, डिसेंबर या दोन महिन्यात ८० हजार रुपयांच्या पुस्तकांची विक्री झाली असल्याची माहिती श्री. वारे यांनी दिली आहे. आर्टी कार्यालयाचा पत्ता बी- २०१/२०२, २ रा मजला, 'बी' विंग, अर्जून सेंटर, स्टेशन रोड, गोवंडी (ईस्ट) येथे पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध आहेत. गोवंडी स्टेशनपासून पूर्वेकडे ५ मिनीटाच्या अंतरावर आर्टी ही संस्था आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता, बायोटेक, क्रिप्टो, ड्रोन आणि अँटी ड्रोन, इलेक्ट्रिक एनर्जी गुंतवणुकीसाठी आघाडीची क्षेत्रे

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : कृत्रिम बुद्धिमत्ता, बायोटेक, क्रिप्टो, ड्रोन आणि अँटी ड्रोन, इलेक्ट्रिक एनर्जी ही गुंतवणुकीसाठी आघाडीची क्षेत्रे आहेत, असे मत नवीन कल्पना, तंत्रज्ञानावर आधारित स्टार्टअप्स, स्टार्टअप्स मधील गुंतवणूक या विषयी द्वितीय चर्चा सत्रात जिओ जेन नेक्स्टचे प्रमुख अमेय माशेलकर, जीतो इनक्युबेशनचे अध्यक्ष जिनेंद्र भंडारी, व्हेंचर कॅटालिस्ट अँड नाईन युनिकॉर्न, सह-संस्थापक, अपूर्व रंजन शर्मा, सह-संस्थापक आणि कार्यकारी उपाध्यक्ष अवेंडसचे राणू वोहरा, सह संस्थापक ई व्हि कॅम्प आशिष वाढवणी यांनी व्यक्त केले.

बांद्रा-कुर्ला संकुल येथील जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत राज्य नाविन्यता सोसायटीच्यावतीने एम्पॉवरींग इनोव्हेशन, एलिव्हेटिंग महाराष्ट्र (स्ंज्दैीग्हु घ्हहर्दर्नूंदह,र्तिंर्नूंहु र्शेंर्ष्टू) या संकल्पनेवर आधारित 'राष्ट्रीय स्टार्टअप्स दिवस' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर यांनी केले.

या चर्चासत्रात नवीन कल्पना, तंत्रज्ञानावर आधारित स्टार्टअप्स, स्टार्टअप्स मधील गुंतवणूक, शैक्षणिक संस्थांची भूमिका, सर्जनशीलता इत्यादींविषयी सखोल चर्चा करण्यात आली. महाराष्ट्रात स्टार्टअप्सना पूरक असे अनेक घटक आहेत. स्टार्टअप्सची सुरुवात करताना तुम्ही निर्भय असणे आवश्यक आहे

उद्योजकतेतील धोरणात्मक परिणाम उद्योजकांच्या महत्त्वाकांक्षेवर अवलंबून असते असे मत आशिष यांनी व्यक्त केले. स्टार्टअप्स शैक्षणिक संस्थांची भूमिका देखील तितकीच महत्त्वपूर्ण असते . आज हे तंत्रज्ञानाचे जग असून नाविन्यता ही केंद्रस्थानी आहे.

तृतीय चर्चा सत्रात स्टार्टअप्समध्ये महिलांचे सक्षमीकरण' या चर्चासत्रात ओपन सिक्रेटच्या संस्थापिका अहाना गौतम, सुपर बॉटमच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी उत्तगी, उद्योजिका श्रेया घोडावत, रिचीवलीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी विभा कागाजी यांनी चर्चासत्रात सहभाग घेतला. सूत्रसंचालन सर्जन सलोनी पटवर्धन यांनी केले.

आहाना गौतम या स्वतःचा अनुभव सांगताना म्हणाल्या की, 'लहानपणापासूनच मी माझ्या आईला माझ्यासाठी काम करताना पाहून तिच्यातून प्रेरणा घेतली. त्यामुळेच मला देखील उद्योग क्षेत्रात यावसं वाटलं. महिलांना काम करताना नेहमी पुरुषांची साथ असते त्यामुळेच महिला देखील पुढे जाऊ शकतात' असे मत व्यक्त केले. वैयक्तिक आलेले अनुभव आणि समाजातील अनुभव यातून महिला उद्योजक देखील स्टार्टअप्समध्ये येत आहेत ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. महिला ही जबाबदारीने काम करत आहेत. कोणत्याही कठीण परिस्थितीवर मात करता येऊ शकते हे महिलांनी अनेक क्षेत्रात आपला ठसा उमटून सिद्ध केले आहे, असे मत महिला उद्योजकांनी यावेळी व्यक्त केले.

नागरिकांना शासकीय सेवा मोबाईलच्या माध्यमातून उपलब्ध करून द्याव्यात : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

राज्य मंत्री परिषदेच्या बैठकीत ऑनलाईन सेवांबाबत चर्चा

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : राज्यातील नागरिकांना जास्तीत जास्त शासकीय सेवा मोबाईलच्या माध्यमातून उपलब्ध झाल्या पाहिजेत. त्यासाठीची ऑनलाईन प्रणाली विकसीत करावी, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्री परिषदेची बैठक झाली. या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह, कॅबिनेट आणि राज्य मंत्री उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राज्यातील विविध विभागांच्या ९६९ सेवा अधिसूचित करण्यात आल्या आहेत. त्यापैकी आपले सरकार पोर्टल वर ५३६ सेवा उपलब्ध आहेत. ९० सेवा संबंधित विभागांच्या पोर्टल वर उपलब्ध आहेत. मात्र सुमारे ३४३ सेवा ऑफलाईन पध्दतीने दिल्या जातात. या सर्वच सेवा आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध करून द्याव्यात. ज्या सेवा सध्या ऑफलाईन पध्दतीने दिल्या जातात त्या सर्व ऑनलाईन करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाने पुढाकार घ्यावा. येत्या शंभर दिवसात हे काम पूर्ण करा. अनेक सेवा अधिसूचित करण्यात आलेल्या नाहीत, त्या सर्व सेवा अधिसूचित करण्यासाठी संबंधित मंत्री आणि सचिवांनी पुढाकार घ्यावा. नागरिकांना सुमारे ९९ टक्के शासकीय सेवा मोबाईलच्या माध्यमातून उपलब्ध झाल्या पाहिजेत. यामुळे नागरिकांना शासकीय कार्यालयात वारंवार जाण्याची आवश्यकता भासणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

राज्यात आपण 'ईज ऑफ डूईंग बिझनेस' संकल्पनेवर काम करण्यावर भर देत आहोत. त्यानुसार अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यावर भर दिला पाहिजे. क्षेत्रीय स्तरावरील अधिकार शासनाकडे केंद्रीत केले जाऊ नये, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

बुलडाणा जिल्ह्यातील केस गळतीच्या घटनांबाबत मंत्री परिषदेत चर्चा झाली. केस गळती झालेल्या लोकांच्या अन्न आणि पाण्याचे नमुने घेतले आहेत. सकृतदर्शनी हे प्रकार बुरशीच्या प्रादुर्भावामुळे होत असल्याचे निदर्शनास येत आहे. बाधित नागरिकांना औषधे आणि मलम वितरित करण्यात आले आहेत. त्यामुळे केस गळतीच्या प्रमाणात घट झाली असल्याचे स्पष्ट होत आहे, अशी माहिती आरोग्य विभागाच्यावतीने देण्यात आली. यावर अशा प्रकारांबाबत आरोग्य विभागाने सतर्क रहावे. तातडीने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. तसेच अशाच प्रकारच्या घटना वर्धा येथे आढळून येत आहेत. त्याकडेही लक्ष द्यावे, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

प्रिन्सटन टाऊनबाबत झेरॉक्सच्या आधारे मुद्रांक शुल्क करावे : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : पुण्यातील येरवडा परिसरातील कल्याणीनगरमधील प्रिन्सटन टाऊन को-ऑप हौसिंग सोसायटीसंदर्भात सह जिल्हा निबंधक वर्ग - १ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर यांच्याकडे दाखल तक्रारीबाबत सोसायटी आणि विकासक यांच्यातील वादामध्ये समजुतीच्या करारनाम्याचा (शर्स्दैह्ल्स् द ळर्ह्लूंह्ग्हु) दस्त सात दिवसांत तक्रारीसोबत सहजिल्हा निबंधक वर्ग - १ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे प्राप्त न झाल्यास उपलब्ध छायांकित प्रतीच्या सत्यतेबाबत विकासकास काही म्हणायचे नाही, असे समजून छायांकित प्रतीच्या आधारे दस्ताची मुद्रांक शुल्क निश्चिती व आवश्यकतेनुसार वसुलीची कार्यवाही सुरू करण्याच्या सूचना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या. या संदर्भात महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांच्या दालनात बैठक झाली. बैठकीस आमदार दीपक केसरकर, उपसचिव सत्यनारायण बजाज उपस्थित होते.

दाखल तक्रारीची दखल घेऊन समजुतीचा करारनामामधील पक्षकार (सोसायटी व निष्पादक) यांना तक्रारीतील समजुतीचा करारनामाचे निष्पादन व त्यास मुद्रांक शुल्क न भरण्याविषयी खुलासा सादर करण्यास नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. परंतु, त्यास प्रतिसाद न मिळाल्याने सह जिल्हा निबंधक वर्ग-२ तथा प्रशासकीय अधिकारी, पुणे शहर यांना बांधकाम व्यावसायिक यांच्या कार्यालयास समक्ष भेट देऊन मूळ समजुतीचा करारनामा ताब्यात घेण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे व तो सह जिल्हा निबंधक वर्ग - १ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे सुपूर्द करण्यास सांगितले आहे, अशी माहितीही बैठकीत देण्यात आली.

संपादकीय...

कूच बिहार!...

जातीचे, जातींना एकत्र करण्याचे राजकारण भरपूर झाल्यावर आता तपासपथकाचीही जात काढली जाते हे आपले सामाजिक जीवन सडत चालल्याचे लक्षण.बिहार, उत्तर प्रदेश वा तत्सम प्रदेशात कार्यालयीन वा अन्य कारणांसाठी वास्तव्य वा प्रवासाचा अनुभव असलेल्यांस ही बाब तत्क्षणी पटेल. त्या प्रांतात माणसे एकमेकांस ''आप कौन जाती के'' असे सहज विचारतात आणि कायस्थ, भूमिहार, पंडित, चमार अशी आपली ओळख करून देणे कोणास कमीपणाचे वाटत नाही. विद्यामान महाराष्ट्र त्या दिशेने वाटचाल करू लागला आहे किंवा काय, असा प्रश्न पडतो. तो पडण्याचे निमित्त कोणा वाल्मीक कराड नामे स्थानिक गावगुंडावरील कारवाई आणि त्यानंतर उद्भवलेली परिस्थिती. या संदर्भात आणि त्यानिमित्ताने बदलत्या महाराष्ट्राबाबत भाष्य करताना एक बाब स्वच्छ मान्य करणे गरजेचे आहे. ती म्हणजे एखादी व्यक्ती समाज वा इतरांसाठी कितीही गुंड, दुर्जन आदी असली तरी त्या व्यक्तीच्या कुटुंबीयांसाठी ती कर्ती आणि कर्तृत्ववान अशी असते. त्यामुळे कारवाईनंतर या कराड याच्या मातोश्री वा पत्नी यांचा भावनोद्रेक समजून घेता येईल. त्याच्या मातोश्रींसाठी वाल्मीक हा श्रावणबाळ असू शकतो आणि पत्नीसाठी आदर्श पती. त्याबाबत कोणाची हरकत असण्याचे कारण नाही. तथापि त्याची पत्नी वाल्मीकवरील कारवाईसाठी जेव्हा जातीचा मुद्दा मांडते त्या वेळी तो विषय कुटुंबापुरता मर्यादित राहात नाही. तो प्रश्न सामाजिक होतो. 'वंजारी म्हणून आमच्यावर कारवाई' असा काहीसा सूर वाल्मीकच्या पत्नीचा होता. तो तसाच स्वीकारला गेल्यास प्रत्येक आरोपीचे आप्तेष्ट असा युक्तिवाद करू शकतील आणि तसे झाल्यास अट्टल गुन्हेगाराच्या कुटुंबीयांसही 'आम्ही अमुक जातीचे/ धर्माचे/ पंथाचे आहोत म्हणून ही कारवाई' असे म्हणण्याची सोय राहील. असे होणे म्हणजे कायद्याचे राज्य ही संकल्पना मोडून पडणे. जन्माला आलेली प्रत्येक व्यक्ती काही तरी सामाजिक ओळख जन्मतःच घेऊन येते. ही जन्मखूण हा काही कारवाईचा वा ती न करण्याचा मापदंड प्रगत समाजात असू शकत नाही. त्यामुळे या कराडवरील कारवाई आणि जातीचे राजकारण हा मुद्दा दखलपात्र होतो. तथापि ही बाब केवळ या वाल्मीकच्या कुटुंबीयांपुरती मर्यादित नाही. ती अधिक व्यापक आहे.आणि त्यामागील कारण म्हणजे या वाल्मीकच्या चौकशी अधिकाऱ्यांची निघालेली जात. या चौकशी पथकातील काही अधिकारी वाल्मीकचे निकटवर्तीय होते/ आहेत इतक्यापुरतीच ती मर्यादित राहिली असती तर कोणास आक्षेप घेण्याची गरज नव्हती. वास्तव तसे नाही. या पथकातील काही अधिकारी वाल्मीकप्रमाणे वंजारी आहेत आणि त्यामुळे त्यास जवळचे आहेत असे आरोप झाले. ते नाकारले गेले नाहीत. पण त्यानंतर सरकारला चौकशी पथकातील काही अधिकाऱ्यांस बदलावे लागले. हे असे करावे लागणे ही बाब केवळ नामुष्कीपुरतीच मर्यादित नाही. तर हे जातीचे वास्तव त्यामुळे मान्य करावे लागले ही यातील महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यातील लाजिरवाणी बाब. वाल्मीक कराड आणि त्याचे कथित बोलवते धनी धनंजय मुंडे हे दोघेही वंजारी. या दोघांना ज्यांनी लक्ष्य केले ते भाजपचे सुरेश धस हे मराठा. तसेच या प्रकरणी मारले गेले ते संतोष देशमुख हेही मराठा. आता मराठा धस यांनी मराठा देशमुखांच्या हत्येस वाचा फोडण्यासाठी हे प्रकरण लावून धरले की त्यांचे कथित मारेकरी हे वंजारी आहेत म्हणून यावर बोंब ठोकली याचे प्रामाणिक उत्तर कधीच मिळणार नाही. मिळाले तरी ते प्रामाणिक आहे असे कोणी म्हणणार नाही. अशा वेळी प्रश्न इतकाच असायला हवा : मराठा धस यांनी वंजारी कराड याच्यावर केलेले आरोप खरे आहेत की नाही? खरे असले तर अन्य मागास समाजातील व्यक्तीवर कथित पुढारलेल्या समाजातील व्यक्तीने ते केले या जातीच्या कारणाने त्याकडे दुर्लक्ष करणार का? आणि नसले तर आरोप करणारा पुढारलेल्या समाजाचा आहे म्हणून त्याकडे काणाडोळा करणार का?कोणत्याही प्रगतिशील समाजात या प्रश्नांची उत्तरे अगदी बालबुद्धीही देऊ शकतील. पण आपल्याकडे नाही. याचे कारण गेली काही वर्षे सडत चाललेले आपले सामाजिक जीवन. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले की एकीकडे व्हॉट्सॲप विद्यापीठात 'पेशवाई' आल्याचे संदेश फिरतात आणि दुसरीकडे मराठा आरक्षणाची मागणी उचल खाते; तर मुख्यमंत्रीपदी मराठा व्यक्ती आल्या आल्या एका जिल्ह्यापुरतीही ओळख नसलेली व्यक्ती रातोरात राज्यस्तरीय होते हे याच सडलेपणाचे लक्षण. ऐन निवडणुकांच्या तोंडावर मराठा आरक्षणाचा न्यायालयात न टिकणारा आदेश याच हिशेबाने काढला जातो. मग हा तापलेला मराठा मुद्दा निष्प्रभ करण्यासाठी राज्यभर 'ओबीसी' मेळावे घेतले जातात आणि या ओबीसींना जवळ करण्याच्या प्रतीकात्मकतेतूनच धनंजय मुंडे यांची सर्व कृत्ये पोटात घातली जातात. संजय राठोड यांच्या सर्व कृत्यांकडे डोळेझाक करून त्यांना मंत्रिमंडळात घेतले जाते ते याच जात या कारणाने आणि त्याच कारणामुळे भाजपतील नैतिक रणरागिण्या राठोड यांस गोड मानून घेतात. छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात न घेणे हा समस्त 'ओबीसीं'वर अन्याय कसा याचे उत्तर याच जात या कारणाने मिळत नाही आणि विदूषकी रामदास आठवले यांस कोपऱ्यातले का असेना मंत्रीपद देणे म्हणजे दलितांस न्याय कसा हा प्रश्न विचारला जात नाही. येथे कोणा एका पक्षास वा नेत्यांस दोष देण्याचा उद्देश नाही. तसे करताही येणार नाही. कारण एक बाळासाहेब ठाकरे यांचा अपवाद वगळता सर्व पक्ष आणि नेत्यांचे राजकारण म्हणजे जात ठिपक्यांच्या रांगोळ्या! सर्वच पक्ष यात दोषी. हे सर्व राजकारणापुरते होते तेथपर्यंत ठीक.तथापि हे सर्व आता प्रशासन आणि पोलीस दलापर्यंत मुरत गेले असून बहुतांशांचे विचार आणि आचार आता जातीच्या अंगानेच होऊ लागले आहेत. ज्या शहराविषयी जेथे जात पाहिली जात नाही असे गौरवोद्गार काढले जात होते त्या मुंबई शहरातील मंत्रालय या राज्य सरकारच्या मुख्यालयात आता जातीचे हिशेब खुलेआम मांडले जातात. मंत्री आपापल्या सगेसोयऱ्यांची वर्णी लावतात आणि हे सगेसोयरे अधिक 'आपले' कोण याच विचाराने प्रशासन चालवतात. इतकेच काय तर हे विष आता माध्यमांपर्यंत मुरू लागले असून सरकारी उच्चपदस्थ वर्ग 'आपल्या जातीच्या' माध्यमकर्मीस जवळ करून बातम्या पेरणे आणि इतरांस दूर राखणे सर्रास करू लागला आहे. हे सर्व नमूद करताना पूर्वी सर्व आदर्श होते आणि आताच या कुप्रथा बोकाळू लागल्या आहेत असे अजिबात नाही. भारतात जात हा घटक होताच. त्यावर मात करून राजकीय यश संपादन करण्यासाठी धर्म हा मुद्दा पुढे केला गेला आणि आता वाढत्या धर्मप्रभावास रोखण्यासाठी पुन्हा जात असा हा प्रवास आहे. एक व्यसन टाळण्यासाठी दुसऱ्याचा आधार घ्यावा तर त्याचेही व्यसन लागावे, तसे हे.शहाण्या व्यक्ती अशा वेळी व्यसनमुक्ती केंद्राचा आधार घेतात. महाराष्ट्रात अद्यापही राजकीय शहाणपण शिल्लक असेल तर राजकीय धुरीणांनी असा काही आधार शोधायला हवा. प्रशासन, पोलीस यांच्यानंतर पुढचा टप्पा न्यायपालिका आणि लष्कर असा असेल. व्यक्ती वा समाज किती उंच कर्तृत्वाचे शिखर गाठतात, यास मर्यादा असू शकतात. पण मूर्खपणाच्या नीचांकास अंत नसतो. हे लक्षात घेऊन या राज्यातील शहाण्यांनी वेळीच सावध व्हावे. अन्यथा आपले बिहारच्या दिशेने सुरू असलेले कूच असेच सुरू राहील.

!!! जनाब, जावेदजी अख्तर! जन्मदिन की मुबारकबाद जी !!

(१७ व १८ जानेवारी: जावेद अख्तर जन्मदिन- वाढदिवस विशेष)



जावेद अख्तर हे भारतीय हिंदी चित्रपटसृष्टीतील नामवंत कथा-पटकथाकार, गीतकार आणि कवी आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीत सत्तरऐंशीच्या दशकात जावेद अख्तर यांनी सलीम खान यांच्यासोबत लिहिलेल्या यशस्वी कथा-पटकथांमुळे सलीम-जावेद ही जोडी जनमानसात प्रसिद्ध झाली. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर माहितीपूर्ण लेख.... संपादक.

जावेद अख्तर यांचा जन्म दिनांक १७ जानेवारी १९४५ रोजी ग्वाल्हेर येथे झाला. त्यांचे वडील जान निसार खान हेदेखील हिंदी चित्रपटसृष्टीत गीतकार आणि कवी होते. जावेद यांचे शालेय शिक्षण लखनौ येथे आणि महाविद्यालयीन शिक्षण भोपाळमधील सोफिया कॉलेजमध्ये झाले. जावेद अख्तर यांनी सुरुवातीच्या काळात कैफी आझमी यांचे साहाय्यक म्हणून काम पाहिले. तसेच याकाळात एका चित्रपटाकरिता संवादही लिहिले; पण त्यात त्यांना फारसे यश मिळाले नाही. सरहदी लुटेरा या चित्रपटाच्या कामावेळी त्यांची सलीम खान यांच्याशी भेट झाली. सलीम-जावेद या जोडीने अधिकार-१९७१ आणि अंदाज या चित्रपटासाठी प्रथमतः एकत्र कथा-पटकथा संवाद लिहिले. सलीम खान हे कथा लिहीत असत आणि जावेद अख्तर त्यांना संवादलेखनात मदत करीत असत. अंदाज आणि अधिकार या चित्रपटानंतर सलीम-जावेद यांनी सीता और गीता-१९७२, यादों की बारात-१९७३, जंजीर-१९७३, हाथ की सफाई-१९७४, दीवार-१९७५, शोले-१९७५, चाचा भतिजा-१९७७, डॉन-१९७८, त्रिशूळ-१९७८, दोस्ताना-१९८०, क्रांती-१९८१, जमाना-१९८५, मिस्टर इंडिया-१९८७ या आणि अशा एकूण २२ हिंदी आणि दोन कन्नड चित्रपटांच्या कथा-पटकथा आणि संवाद लिहिले. त्यांनी लिहिलेल्या चोवीस चित्रपटांपैकी आखरी दाँव, इमान धरम, काला पत्थर आणि शान हे चार चित्रपट सोडल्यास बाकीच्या चित्रपटांनी तिकीटबारीवर उत्तम यश संपादन केले.



संकलन व सुलेखन - श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.एक प्राणीप्रेमी. रामनगर वॉर्ड, गडचिरोली. फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

जावेद अख्तर आणि सलीम खान या जोडीमुळे 'सिने पटकथाकार' या भूमिकेला एक विशिष्ट दर्जा प्राप्त झाला. चित्रपटाच्या जाहिरात पृष्ठावर कथा-पटकथालेखक तसेच संवादलेखक यांचे नाव यायलाच हवे असा त्यांचा आग्रह असे. सन १९८२नंतर मात्र सलीम-जावेद जोडीत बेबनाव होऊन ते वेगवेगळे झाले. यानंतर जावेद अख्तर कथा-पटकथालेखक आणि त्याचबरोबर गीतकार म्हणूनही स्वतंत्रपणे उदयास आले. त्यांनी स्वतंत्रपणे लिहिलेल्या चित्रपटांत बेताब-१९८३, मशाल-१९८४, सागर-१९८५, अर्जुन-१९८५, मेरी जंग-१९८५, डकैत-१९८७, लक्ष्य-२००४ आणि डॉन-द चेस बिगिन्स अगेन-२००६ हे चित्रपट उल्लेखनीय समजले जातात. त्यांनी ८०हून अधिक चित्रपटांकरिता गाणी, कथा-पटकथा आणि संवाद लिहिले आहेत.

गीतकार म्हणून जावेद अख्तर यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. जनसामान्यांसाठी सहज, सोपी आणि उडत्या चालींची गाणी तर त्यांनी लिहिली आहेतच; पण त्याचबरोबर अत्यंत तरल आणि अर्थगर्भ गीतेही लिहिली आहेत. ''तुमको देखा तो ये खयाल आया'', ''संदेसे आते हैं'', ''एक लडकी को देखा तो ऐसा लगा'', ''पंछी, नदियाँ, पवन के झोंके'' या आणि अशा अनेक गीतांमधून त्यांनी मानवी मनातील भावभावनांचा कोलाज उभा केला आहे. साज (मेलडी-१९९७), बॉर्डर-१९९७), गॉडमदर-१९९९, रेफ्युजी-२००० आणि लगान-२००१ या चित्रपटांतील माणसाच्या जगण्याचा तळ शोधणाऱ्या गीतांसाठी जावेदजी यांना उत्कृष्ट गीतकार म्हणून पाच वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. तसेच तरकश आणि लावा हे त्यांचे कवितासंग्रह देखील रसिकांच्या पसंतीस उतरले आहेत. त्यातील लावा या कवितासंग्रहास उर्दू भाषेतील ''साहित्य अकादमी'' पुरस्कार प्राप्त झाला आहे.

जावेद अख्तर यांच्या पहिल्या पत्नीचे नाव हनी इराणी आहे. हनी इराणी याही पटकथा लेखाकार आहेत. या दोघांना फरहान आणि झोया ही दोन मुले झाली. फरहान अख्तर हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक, निर्माता व अभिनेता आहे. तर झोया अख्तर याही यशस्वी चित्रपटनिर्माती व दिग्दर्शक म्हणून कार्यरत आहेत. जावेद अख्तर यांनी हनी इराणींपासून विभक्त झाल्यावर हिंदी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेत्री शबाना आझमी यांच्याशी विवाह केला. जावेद यांनी फरहान यांच्याबरोबर दिल चाहता है, लक्ष्य, रॉक ऑन आणि मुलगी झोया बरोबर 'जिंदगी ना मिलेगी दोबारा' या चित्रपटांवर काम केले आहे.

जावेदजी अख्तर यांना भारत सरकारने चित्रपटातील उत्कृष्ट कारकीर्दीसाठी १९९९ साली ''पद्मश्री'' आणि नंतर २००७ साली ''पद्मभूषण'' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित केले आहे. तसेच जावेद अख्तर यांनी त्यांच्या कारकीर्दीत उत्कृष्ट गीत, संवाद आणि कथेसाठी अनेक फिल्मफेअर पुरस्कारही मिळवले आहेत. बुद्धिवादाला सदैव साक्षी ठेवणाऱ्या आणि पारंपरिक, श्रद्धाळू विचारसरणीला धिक्कारणाऱ्या जावेद अख्तर यांनी आपल्या जाहीर वक्तव्यांतून आणि साहित्यकृतींतून धर्मनिरपेक्षता आणि मानवी हक्क या लोकशाही मूल्यांचा निर्भिडपणे पुरस्कार केला आहे. सन २०२० साली ''रिचर्ड डॉकीन्स'' पुरस्काराने त्यांच्या या भूमिकेचा आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यात आला आहे. कलात्मकतेला जोपासत व्यावसायिकता सांभाळणाऱ्या आणि भारतीय समाजातील विविधतेवर प्रेम करणाऱ्या या मनस्वी कलावंताला भारतीय चित्रपटसृष्टीत मानाचे स्थान आहे.

अलीकडेच गीतकार जावेद अख्तर यांनी एका शोमध्ये गाणेट लिहिण्यास का होकार दिला? याचा खुलासा केला. ते म्हणाले, 'मी सहसा चित्रपटात फक्त एकच गाणं लिहित नाही. राजू हिराणी सरांनी मला फक्त एका गाण्याचे बोल लिहायला सांगितले. मी नकार दिला, पण ते आग्रहाने म्हणाले, 'हे गाणे आपल्या शिवाय कोणीही लिहू शकत नाही.' यानंतर मी त्याच्यापुढे काही अटी ठेवल्या आणि मग ते लिहिले. जावेद अख्तर पुढे म्हणाले, 'त्यांनी डोळे न बघता त्या अटी मान्य केल्या. हा माझा चमत्कार नाही, हा राजू हिराणीचा चमत्कार आहे, ज्यांच्या मागे ५ सुपर-डुपर हिट चित्रपट होते, त्यांना समजले की मला या माणसाकडून हे गाणे मिळेल. अहंकार त्यांच्यावर जबरदस्त नव्हता, उलट त्यांच्या चित्रपटावरील प्रेम त्यांच्यावर जबरदस्त होता. त्याला सलाम!'

!! आज जावेदजींचा वाढदिवस, त्यानिमित्त त्यांना आभाळ भरभरून हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

पतंग गर्दी...

पतंग
महोत्सव सुरु
अस्मानी सुंदर गर्दी
काही नवीन नवखे
कुणी निष्णात दर्दी

लहानमुला समवेत
खुलली दादा दादी
मुलीही आघाडीवर
कर्तृत्व गगना भेदी

सकाळी खेळ जरा
दिस अवघाआनंदी
क्षणभंगूर आयुष्या
स्थाई स्थावर संधी

निकोपनिर्मळ सारे
सर्वां खुलीआझादी
गोड गुलाबी थंडीत
वातावरणआल्हादी

माहीत नसते कधी
कोण तो प्रतिस्पर्धी
फक्त दिसती पतंगी
नाही शत्रुत्व व्याधी

नायलॉन मांजा ना
पाळावीकडकबंदी
गालबोट न लागावे
नको वागणे बेबंधी

चिरकाल टिके सुख
पतंग असूनिकागदी
पीक आले रंजनाचे
हे शंभरटक्के नगदी

-- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

शिबिर...

प्रत्येकपक्षांचे
भरते
खास चिंतन शिबिर
चिंतनीय स्थितीमधे
होता अधिक गंभीर

भक्त गण येती सारे
उडवे गुलाल अबीर
ज्ञानामृत पाजे खूप
ते व्याख्यातेबलबीर

रडारवर खास राही
जे सत्तेसाठी अधीर
नाराजांची समजूती
अंमळ धरा बरे धीर

टोचून घेई कर्मेंद्रिये
अस्वस्थ कर्ण बधीर
चाले अधिक विचार
खुर्ची हलता अस्थिर

रातकिडे वळ वळता
शांतकरावी किरकिर
भाग्यरेखा शोधे बरी
आखावी नवी लकीर

कायमची सत्तास्थाने
नाही कुणा जाहंगिर
कुणी बोले प्रबोधनां
झाला भलता उशीर

अपेक्षीत शिबीरार्थी
वागे नीत आदबशीर
नंदी बैल जे नामधारी
फक्त डोलवतात शीर

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

विविध योजनांचे सुसूत्रीकरण आणि साधनसंपत्तीच्या स्रोतांमध्ये वाढ करण्यासाठी समिती

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : विविध विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे मूल्यमापन करुन त्यांचे सुसूत्रीकरण करणे तसेच साधनसंपत्तीच्या स्रोतांचा अभ्यास करुन त्यामध्ये वाढ करण्याच्या उपाययोजना करण्यासाठी राज्यमंत्री (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून याचा शासन निर्णय वित्त विभागामार्फत दि.१६ जानेवारी २०२५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

उपमुख्यमंत्री (वित्त) यांनी दिनांक २८ जून, २०२४ रोजी सन २०२४-२५ या वर्षाचा अतिरिक्त अर्थसंकल्प विधानसभेत सादर करताना केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणात खर्चाचे नियोजन करण्याच्या अनुषंगाने योजनांचे सुसूत्रीकरण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचे घोषित केले होते. तसेच, मुख्य सचिव यांच्या तिसऱ्या राष्ट्रीय परिषदेमध्ये मर्यादीत निधीचा चांगल्या प्रकारे वापर आणि जलद आर्थिक वाढ साध्य करण्यासाठी योजनांचे एकत्रिकरण करणे, संस्थांचे एकत्रिकरण करणे, अनुत्पादक अनुदान योजना कमी करणे तसेच उत्पादक भांडवली खर्च वाढविणे यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना प्रधानमंत्री महोदयांनी सर्व राज्यांना दिल्या आहेत. या बाबींच्या अनुषंगाने राज्यातील सुरु असलेल्या योजनांचे मूल्यमापन करुन सुसूत्रीकरण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.

या समितीच्या अध्यक्षपदी राज्यमंत्री (वित्त) असून समिती सदस्यांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र (महाराष्ट्र इन्स्टीट्यूटशन फॉर ट्रान्स्फॉरमेशन), अपर मुख्य सचिव (वित्त), अपर मुख्य सचिव (नियोजन), प्रधान सचिव (व्यय) हे निमंत्रक असून, सचिव (वित्तीय सुधारणा), संबंधित विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव हे सदस्य आहेत.

या समितीची कार्यकक्षा पुढील प्रमाणे आहे - विविध प्रशासकीय विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या राज्य योजनाचे / जिल्हा योजनांचे लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत थेट पोहचावेत यासाठी अशा सर्व योजनांचे मुल्यमापन करुन त्याचे सुसूत्रीकरण करण्यासाठी संबंधित विभागासमवेत आढावा घेवून शासनास शिफारस करणे, विविध योजनांच्या सुसूत्रीकरणासंदर्भात मित्र संस्थेने तयार केलेले प्रस्ताव देखील या समितीस सादर करण्यात यावेत, समितीने संबंधित विभागासमवेत अशा प्रस्तावांबाबत आढावा घेवून शासनास शिफारस करणे, कालवाह्य झालेल्या योजनाच्या बाबतीत तसेच, ज्या ठिकाणी योजनांच्या लाभाची द्विरुक्ती होत असेल, योजनांच्या उदिष्टाच्या अनुषंगाने द्विरुक्ती होत असेल, अशा योजनांचे सुसूत्रीकरण करण्यासाठी शासनास शिफारस करणे, मर्यादीत निधींचा चांगल्या प्रकारे वापर आणि जलद आर्थिक वाढ साध्य करण्यासाठी योजनांचे एकत्रिकरण करणे, संस्थांचे एकत्रिकरण करण्यासाठी शासनास शिफारस करणे, महाराष्ट्र शासनाच्या साधनसंपत्तीच्या कर उत्पन्न व करेतर उत्पन्न यांचा स्रोताचा अभ्यास करुन त्यामध्ये वाढ करण्यासाठी उपाययोजना सुचविण्याचे काम या समितीद्वारे केले जाईल, असे शासन निर्णयात नमूद आहे.

'झिरो पेंडन्सी अँड डेली डिस्पोसल' उपक्रमातून उच्च व तंत्र शिक्षण विभागात प्रलंबित फाईली निकाली निघण्याचा धडाका

वृत्तसंस्था ■ मुंबई

विभागातील ४ हजार ४७० प्रकरणे निकाली

मुंबई : प्रशासन लोकाभिमुख आणि गतिमान व्हावे, यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागात झिरो पेंडन्सी अँड डेली डिस्पोझल (ीद जर्ह्हर्म्ह्ह्र्त्र्म्ज्र्दत) उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे विभागातील प्रलंबित फायली निकाली निघण्याचा धडाका सुरू आहे. या उपक्रमात ४ हजार ४७० प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

विभागात प्रलंबित फाईल राहू नये, यासाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी पुढाकार घेऊन ३१ जानेवारीपर्यंत उच्च शिक्षण विभागात झिरो पेंडन्सी उपक्रम राबवावा अशा सूचना दिल्या होत्या. तसेच उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी १ फेब्रुवारीपासून अचानक शिक्षण सहसंचालक कार्यालयांना भेट देऊन कार्यालयांच्या कामकाजाचा आढावा घेण्याचा निर्णयही घेतला आहे. तसेच विद्यापीठ, महाविद्यालयांना भेट देण्याबरोबरच प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी यांच्याशीही संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेणार आहेत.

प्रलंबित प्रकरणाबाबत संचालनालयाकडे प्राप्त तपशीलाच्या आधारे संचालनालय व अधिनस्त कार्यालयांमधील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याबाबत संचालनालय स्तरावर विचारविनिमय करुन कृती कार्यक्रम तयार करण्यात आला आहे.

यामध्ये सर्वप्रथम प्रलंबित प्रकरणे, टपालाचे वर्गीकरण करण्यात आले आहे. अनुकंपा, वैद्यकीय देयके, भविष्य निर्वाह निधी प्रकरणे, अर्जित रजा रोखीकरण प्रकरणे, वेतननिश्चिती प्रकरणे, सेवानिवृत्ती प्रकरणे यांचा यामध्ये प्रकर्षाने समावेश करण्यात आला आहे. या प्रकरणांचे वर्गीकरण करुन आवश्यकतेनुसार शासकीय आस्थापनांवरील किंवा विद्यापीठांमधील काही कर्मचाऱ्यांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात उसनवारी तत्वाने उपलब्ध करुन घेऊन दि. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत प्रलंबित असलेली प्रकरणे तातडीने निकाली काढण्याची राज्यव्यापी मोहिम राबविण्यात आली. यामध्ये प्रत्येक दिवशी करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीदेखील कार्यालये सुरु ठेवून प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला.

यामध्ये तंत्र शिक्षण संचालनालयातील १ हजार ४९० पैकी १हजार ३५३ प्रकरणांचा आणि उच्च शिक्षण संचालनालयातील ४ हजार १८३ पैकी ३ हजार ११७ प्रकरणांचा समावेश आहे. अशाप्रकारे उच्च व तंत्र शिक्षण विभागातील एकूण ४ हजार ४७० प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. उर्वरित प्रकरणे ३१ जानेवारीपर्यंत निकाली काढण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

सायबर चोरट्यांकडून दोघांची २८ लाखांची फसवणूक

वृत्तसंस्था ■ पुणे



पुणे : जादा कमाईचे आमिष आणि अर्धवेळ नोकरीच्या आमिषाने सायबर चोरट्यांकडून हडपसर परिसरातील दोघांची २८ लाखांची फसवणूक करण्यात आली आहे. जादा कमाईचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी एकाला तब्बल १५ लाख १५ हजारांचा ऑनलाईन गंडा घातला. ही घटना १० सप्टेंबर ते ११ नोव्हेंबर २०२३ कालावधीत हडपसरमध्ये घडली आहे. याप्रकरणी दर्शन धार्मिक (वय ४३) यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार हडपसर पोलिसांनी मोबाइलधारक चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दर्शन हे हडपसरमध्ये राहायला असून, सायबर चोरट्यांनी १० सप्टेंबर २०२३ मध्ये त्यांना दूरध्वनी केला. त्यांचा विश्वास संपादित करून वेळोवेळी प्रीपेड टास्क देऊन पूर्ण करण्यास सांगितले. त्याबदल्यात किरकोळ स्वरूपात परतावा दिला. त्यामुळे दर्शन यांनी गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. सायबर चोरट्यांनी त्यांना जादा कमाईचे आमिष दाखविल्यानंतर दर्शनने वेळोवेळी गुंतवणूक केली. तब्बल १५ लाखांहून अधिक रकमेची गुंतवणूक केल्यानंतरही त्यांना परतावा मिळाला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी तक्रार नोंदविली. पोलीस निरीक्षक अमर काळंगे पुढील तपास करीत आहेत.

दुसऱ्या घटनेमध्ये अर्धवेळ नोकरीच्या आमिषाने तरुणाला १३ लाख ४८ हजारांचा ऑनलाईन गंडा घातला. ही घटना २४ मे ते २६ सप्टेंबर २०२४ कालावधीत हडपसर परिसरात घडली आहे. याप्रकरणी सतीश रासकर (वय ४९, रा. हडपसर) यांनी काळेपडळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार रासकर हे हडपसरमध्ये राहायला असून आरोपीसोबत त्यांची ओळख झाली होती. २४ मे २०२४ रोजी आरोपींनी त्यांना अर्धवेळ नोकरीचे आमिष दाखविले. त्यासाठी काही रक्कम द्यावी लागेल, तरच नोकरी मिळेल असे सांगितले. नोकरीसाठी रासरकर यांनी रक्कम आरोपीच्या बँक खात्यात वर्ग केली. वेळोवेळी रक्कम जमा करीत तब्बल १३ लाखांहून अधिक रक्कम जमा केल्यानंतरही त्यांना नोकरी मिळाली नाही. फसवणूक झाल्याप्रकरणी रासकर यांनी तक्रार नोंदविली असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील पुढील तपास करीत आहेत.

मुंबई पुन्हा रक्तरंजित होण्याच्या मार्गावर :९०च्या दशकातील दहशतीचा प्रयत्न :खा.प्रियांका चतुर्वेदी

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : सलमान खानच्या घरावर गोळीबार, बाबा सिद्दिकीची हत्या आणि आता सैफ अली खानवर चाकू हल्ला या सर्व भयानक घटना वांद्रेसारख्या उच्चभ्रू वस्तीत घडल्या आहेत. ९०च्या दशकासारखा मुंबईत दहशत माजवण्याचा प्रयत्न केला जात आहे. मुंबई देशाची आर्थिक राजधानी असून तिथे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. राज्याचे गृहमंत्री जे स्वतः मुख्यमंत्री आहेत. देशाचे व राज्याचे दोन्ही गृहमत्री भाजपाचे आहेत. वांद्रे इथले आमदार मंत्री, तेही भाजपाचेच आहेत, तरीही अशा प्रकरणातून धडा घेतला जात नाही, ही बाब लाजीरवाणीच म्हणावी लागेल, असं सांगत ठाकरे गटाच्या राज्यसभा खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी सत्ताधारी-महायुती सरकारवर निशाणा साधला आहे.

सैफ अली खानवरील हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी माध्यमाशी संवाद साधला. त्या म्हणाल्या की, वांद्रेसारखा परिसर, जेथे सर्वात जास्त सेलिब्रिटी राहतात,

तिथली सुरक्षा व्यवस्था शहरातील इतर भागापेक्षा जास्त असणे अपेक्षित आहे. तिथे अशाप्रकारची घटना होणे म्हणजे, यातून असेच स्पष्ट होत आहे की, शहरात कुणीही सुरक्षित नाही, असा संदेश लोकांमध्ये पसरतो. बाबा सिद्दिकी कुटुंबाला अद्याप न्याय मिळाला नाही. सलमान खान कुटुंब सुरक्षित वातावरणात राहू शकत नाही. आतापर्यंत पोलिसांनी लॉरेन्स बिश्नोईला मुंबईत आणलं का? केंद्र सरकारकडून बिश्नोईला संरक्षण दिले जातेय. मुंबईतील कायदा व सुव्यवस्था बऱ्याच प्रमाणात बिघडली आहे, असं त्यांनी सांगितलेय.

त्याशिवाय गृहमंत्र्यांनी अधिक जागरूक होणे गरजेचे आहे. राजकारण कमी आणि सुरक्षा व्यवस्थेसारख्या महत्वपूर्ण अशा कामावर जास्त लक्ष दिले पाहिजे. मुंबईत ज्यारितीने सातत्याने हल्ल्याच्या घटना घडतायेत, त्यातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उभा राहतो. ज्या ज्या घटना घडल्या आहेत, त्याविषयी लवकरात लवकर पूर्ण कारवाई करून न्याय दिला पाहिजे. पोलीस यंत्रणाशी संवाद साधून शहरात सुरक्षित वातावरण तयार केले पाहिजे अशीही मागणी खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी केली.

दरम्यान, सैफ अली खानवरील हल्ला होणे म्हणजेच ही बाब अत्यंत धक्कादायक अशीच आहे. आज बुलेटप्रुफ घरात राहण्याची सलमान खानवर वेळ आली आहे. दिवसाढवळ्या बाबा सिद्दिकी यांची हत्या झाली. बिल्डर लॉबीकडे दुर्लक्ष केले जातेय. या सर्व घटना वांद्रे इथेच घडल्या आहेत. या घटना प्रसिद्ध व्यक्तींसोबत घडल्या आहेत. हे सर्व विशेषत्वाने मुंबईतच घडले जात असल्याने मुंबईत पुन्हा दहशत पसरवण्यासाठी केले जातंय, असंही प्रियंका चतुर्वेदी यांनी म्हटलं आहे.

एकूणच काय तर, वरील सर्व घटना भयानक असून कायदा व सुव्यवस्था धाब्यावर बसविण्यासारखेच आहे. खून, खूनाच्या दोन वेगवेगळ्या घटना घडवण्याचा प्रयत्न करुन शहरात एकप्रकारे दहशत माजविण्यासारखच आहे. या सर्व गंभीर प्रकरणांवरुन मुंबई पुन्हा रक्तरंजित होण्याच्या मार्गावर तर नाही ना ? अशी शंका येणं स्वाभाविकच आहे. राज्य व केंद्रात दोन्ही ठिकाणी भाजपाच्याच प्रमुख नेतृत्वाखाली सत्या आहे. त्यामुळे दोन्ही सरकारांनी कटाक्षाने व गांभीर्याने लक्ष देऊन वाढती गुंडगिरी व दहशत मोडून काढणे निश्चितपणे गरजेचे आहे....अन्यथा दिवसाढवळ्या मुडदे पाडून खून खराबा झाल्याशिवाय राहणार नाही एवढे निश्चित..!

हल्ला करणारी 'ती' व्यक्ती कोण ?

सैफवर ज्या व्यक्तीने हल्ला केला, ती व्यक्ती रात्रभर सैफच्या घरातच होती, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. हल्लेखोराचा ?रात्री २ वाजता सैफच्या घरातील महिला कर्मचाऱ्यांशी वाद सूरु असल्याचा आवाज सैफ अली खानला आला.आवाज ऐकून तो बाहेर आला आणि हा प्रकार घडला असल्याचं बोललं जात आहे.

जिल्हा स्तरीय मल्लखांब स्पर्धेत भांबर्डे शाळा ठरली प्रथम क्रमांकाची मानकरी

दै, जनप्रभात रांजणगाव गणपती प्रतिनिधी ■ **बाळासाहेब कुंभार**



रांजणगाव गणपती : दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण कला क्रीडा व सांस्कृतिक जिल्हास्तरीय स्पर्धा यांचे आयोजन हुतात्मा शिवराम हरी राजगुरू क्रीडा संकुल राजगुरुनगर येथे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये प्रथमच नव्याने समावेश करण्यात आलेल्या मल्लखांब स्पर्धेमध्ये पुणे जिल्ह्यातील एकूण १३ तालुक्यातील तेरा संघाने आपला सहभाग नोंदवला या स्पर्धेसाठी राष्ट्रीय पंच प्रियांका मोरे व अश्विनी कीरदत यांनी कामकाज पाहिले या खेळात जिल्हा परिषद शाळा भांबर्डे तालुका शिरूर जिल्हा पुणे यांनी प्रथम क्रमांक मिळवला .द्वितीय क्रमांक म्हणून मावळ तालुक्यातील सांगवडे शाळेने मिळवला ,तसेच तृतीय क्रमांक जुन्नर तालुक्यातील हिवरे तर्फे नारायणगाव या शाळेचा आला.जिल्हा परिषद शाळा भांबर्डे येथील विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्टपणे मलखांबाचे सादरीकरण करून प्रथम क्रमांक मिळवला मार्गदर्शक श्री विठ्ठल देशमुख, मुख्याध्यापक श्री नानाभाऊ नाणेकर ,श्री सुनील निचित ,श्री श्रीकांत निचित ,सौ कमल वीर, सौ सरला फुंदे सौ कविता निचित मॅडम ,श्री गोरक्षनाथ नाणेकर यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. व तांत्रिक सहाय्य श्री सय्यद सर यांनी केले.

प्रथमच जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये भांबर्डे संघाला विजेतेपद मिळाल्यावर पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी श्री बाळकृष्ण काळमकर साहेब व विस्तार अधिकारी किसन खोडदे केंद्रप्रमुख श्री किसन शिंदे साहेब सरपंच श्री संदीप शेठ रोडे व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री अनिल वीर यांनी जिल्हा परिषद शाळा भांबर्डे येथील विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना स्पोर्ट ड्रेस व इतर साहित्य यांची मदत डॉक्टर भगवान पवार हॉस्पिटल शिक्रापूर यांनी केली.

कैलास सत्यार्थी फाउंडेशन च्या वतीने शिरूर तालुक्यातील ४० शाळांमध्ये स्क्रीनसह, प्रोजेक्टर संगणक साऊंड सिस्टम देण्यात आली

पुणे ■ विवेकानंदन फंड



पुणे : कैलास सत्यार्थी चिल्ड्रेन्स फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीस चालना मिळावी, तंत्रज्ञानाचा वापर अध्यापनात सुलभतेने करता यावा यासाठी जि प प्राथ शाळा कान्हूर मेसाईस त्यांच्या वतीने एक स्क्रीनसह प्रोजेक्टर एक संगणक,साऊंड सिस्टम इत्यादी संगणक साहित्य देण्यात आली.

यापूर्वीही कैलास सत्यार्थी चिल्ड्रन्स फाउंडेशनच्या वतीने मुलांमध्ये वाचन संस्कृती जोपासावी म्हणून तालुक्यात ४० अद्ययावत ग्रंथालय देण्यात आले आहे.

याप्रसंगी श्री सुभाष गतखाणे, अकाउंट ऑफिसर प्रज्वल थोपटे,प्रोजेक्ट ऑफिसर श्री. अमोल राठोड, असिस्टंट प्रोजेक्ट ऑफिसर मयुरा दळवी, कम्युनिटी सोशल वर्कर स्वाती थोरात सामाजिक कार्यकर्ते श्री. सचिन थोरात,

तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री योगेश पुंडे,

उपाध्यक्षा श्री विद्याताई ननवरे, श्री ज्ञानेश्वर ननवरे संकटमोचक शहाजी दळवी, मा.उप सरपंच दीपक तळोले, संचालक श्री अनिल चौधरी, केंद्राचे केंद्रप्रमुख श्री सुनील जोशी, मुख्याध्यापक किसन हारपुडे, शिक्षक वर्ग,आदि मान्यवर उपस्थित होते.यानिमित्ताने श्री शहाजी दळवी याच्या हस्ते सामाजिक कार्यकर्ते श्री सचिन थोरात यांना सन्मानित करण्यात आले.

कैलास सत्यार्थी चिल्ड्रेन्स सोशल फाउंडेशन चे शाळा,शाळा व्यवस्थापन समिती,ग्रामस्थ आणि पालकांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

सरस्वती महाविद्यालयात विद्यापीठ नाम विस्तार दिन साजरा

केज ■ तात्या गवळी



केजः उपेक्षित, वंचित, गरीब, मजूर,शेतकरी यांच्या प्रवाहा बाहेरील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची द्वारे मराठवाड्यासारख्या अविकसित भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिलिंद महाविद्यालयाच्या माध्यमातून खुली केली. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हा नाम विस्तार दलित, उपेक्षित आणि बहुजनांचा विचाराचा विजय असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ.हनुमंत सौदागर यांनी केले. ते सरस्वती महाविद्यालय केज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ विस्तार दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गौतम पाटील हे होते.

अध्यक्ष समारोपप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. पाटील म्हणाले की, विद्यापीठाला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देणे ही फक्त बाबासाहेबांना नव्हे तर विद्यापीठासाठी अत्यंत गौरवाची बाब असल्याचे सांगितले. कार्यक्रमास प्रा.डॉ.आहेर, प्रा. डॉ.चाटे, प्रा.डॉ.शिंदे,प्रा. डॉ. आरडले, प्रा.डॉ.वराळे, प्रा.डॉ. कराळेआदींची होती. सूत्रसंचालन प्रा. डॉ. किरणकुमार धिमधिमे तर आभार प्रा. डॉ. सारिका बुरगे यांनी मानले. यावेळी प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

रांजणगाव विविध विकास सोसायटीच्या अध्यक्षपदी राजेश लांडे यांची निवड

दै, जनप्रभात रांजणगाव गणपती प्रतिनिधी ■ **बाळासाहेब कुंभार**


श्री.राजेश दत्तोबा लांडे (राजुशेठ)

रांजणगाव गणपती : आज दि. १६ जानेवारीला रांजणगाव गणपती विविध विकास कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन पदी राजेश दत्तोबा लांडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली असल्याची माहिती सोसायटीच्या सचिव आरती शेळके-गोरे यांनी दिली.

मावळते चेअरमन फक्कडराव धुमाळ यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर चेअरमन पदी राजेश लांडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य शेखर पाचुंदकर , राहुल पाचर्णे, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख व सोसायटीचे माजी चेअरमन बापूसाहेब शिंदे, शिरूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष रवी काळे, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष राजेंद्र नरवडे, भारतीय जनता पार्टीचे माजी तालुका अध्यक्ष भगवान शेळके, कुकडी सहकारी साखर कारखान्याचे संचालक अशोक वाखारे, घोडगंगा सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक कैलास सोनवणे , देवस्थान ट्रस्टमध्ये माजी अध्यक्ष दत्तोबा लांडे, माजी सरपंच सर्जेराव खेडकर, राजमुद्रा पतसंस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय पाचुंदकर, माजी उपसरपंच राहुल पवार,धनंजय पवार,अजय गलांडे, सुरेखा प्रकाश लांडे,दादामामा शेळके, गणेश लांडे,काळुराम पाचुंदकर हुंडेकरी,गणेश पाचुंदकर,प्रताप पाचुंदकर , गणेश लवांडे,सागर देवकर,कैलास शेळके यांसह विविध संस्थांचे आजी- माजी पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कंधारच्या सेवा शक्ती संघर्ष एस.टी. कर्मचारी संघाची नुतन कार्यकारणी जाहीर; अध्यक्षपदी संभाजी घुगे तर सचिव शंकर दुल्हेवाड

कंधार ■ संतोष कांबळे



कंधार : राज्य परिवहन महामंडळ कंधार आगारात भारतीय जनता पार्टी प्रणित व आ. गोपीचंद पडळकर व आ. सदाभाऊ खोत प्रणित सेवा शक्ती संघर्ष संघाची दि. १६ जानेवारी रोजी शासकिय विश्रामगृह कंधार येथे पार पडलेल्या बैठकीत कंधार आगार अध्यक्ष पदी संभाजी घुगे तर सचिव पदी शंकर दुल्हेवाड तर महिला कार्यकारणी अध्यक्षा जयश्री मुंडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

कंधार येथील शासकीय विश्रामगृहात पार पडलेल्या बैठकीत सेवाशक्ती संघर्ष कर्मचारी संघाच्या नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली यावेळी भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष ?ड. गंगाप्रसाद यन्नावार, कर्मचारी संघटनेचे विभागीय सचिव गोविंद फुले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये नूतन कार्यकारणीची निवड करण्यात आली. यावेळी उपाध्यक्ष निवृती पोले, कार्याध्यक्ष शिवराज बोधगीरे, सहसचिव मधुकर मुंडे, बाळु केंद्रे, प्रसिध्दी सचिव कपिल लासे, आर.एम.जंगले, व्ही.बि.अभंगे, कोषाध्यक्ष नामदेव धोंडगे, एम यु रेणकुंटवार, गजानन कानडे, सदस्या एस.डी मारवाडे, आर. व्ही. शेंडगे, डी.एस.केंद्रे, व्ही.एल.किरतवाड, एस. बी. एंगलवार यांची निवड करण्यात आली.या प्रसंगी आर.एम. केंद्रे, आर.जे.पाटील, डि.एम. कंधारे, संभाजी धाबेवार, आर.एम. आडकुटे, एस.एस. शेळके, एस. एस. केंद्रे, दि पक कोंम्पलवार, मोहन शेकापुरे, पि.आर. गित्ते, जे.पी. मुंडे, व्ही.डी.मुंडे, विक्की मंगनाळे यांच्यासह आदी कर्मचारी उपस्थीत होते.

बाबुरावजी आडसकर महाविद्यालयातील डॉ.काशिद व डॉ.हिरवे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

केज ■ तात्या गवळी



केजः केज येथील नगर पंचायत व जन विकास परिवर्तन आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार बाबुरावजी आडसकर महाविद्यालयातील वनस्पती शास्त्र विभागातील कार्यरत प्राध्यापक डॉ.एन.जी.काशिद व डॉ.बी.जे.हिरवे यांना प्रदान करण्यात आला.नगर पंचायतीच्या प्रांगणात झालेल्या राष्ट्रमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या संयुक्त जयंती सोहळ्यात शिक्षण, पत्रकारिता, वैद्यकीय शिक्षण,संगित,महिला बचतगट इत्यादी क्षेत्रात नाविन्यपूर्ण काम करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले.

न.प.च्या नगराध्यक्षा सीता ताई बनसोड, हारुणभाई इनामदार यांच्या हस्ते डॉ.काशिद व डॉ.हिरवे यांना शिक्षण व संशोधन क्षेत्रातील नाविन्यपूर्ण कामाबद्दल पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले.

त्यांच्या या यशाबद्दल छ.शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव रमेशराव आडसकर,अर्चनाताईआडसकर ,प्राचार्य डॉ.एम.जी.फावडे , अधिक्षक पी.एस.भोसले , ग्रंथालय प्रमुख डॉ.आशा बोबडे,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या दोहोंचे अभिनंदन व कौतुक केले आहे.



नांदेड पोलीस दलात नव्यानेच निवड झालेल्या मुलींचा सत्कार करून भावी कार्यास शुभेच्छा देताना माजी जिल्हा परिषद सदस्या तथा नांदेड जिल्हा महिला काँग्रेसच्या उपाध्यक्षा सौ. वर्षाताई संजय भोसीकर यावेळी प्राचार्य किरण बडवणे, सौ. श्यामा पाटील पोलीस दलातील सोनाली निकम, अंकिता कुऱ्हाडे, मेहमुना शेख, वैष्णवी सपाटे, पूजा मारवाडे, सुषमा मते, प्रियंका कदम आदी. छाया - संतोष कांबळे

कोरेगावातील सार्वजनिक बांधकाम विभागाची उपा अभियंता डी. ए. पाटील यांना तात्काळ निलंबित करा; रमेश उबाळे यांची मागणी, अन्यथा २६ जानेवारीला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा दिला इशारा

कोरेगाव ■ अज्जू मुल्ला



कोरेगाव : सार्वजनिक बांधकाम विभागाचे कोरेगाव येथील उपअभियंता डी. ए. पाटील यांनी संविधानाचा आणि राजमुद्रेचा अनादर केला आहे. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे राजमुद्रा आणि संविधान उद्देशिकेचा अवमान झाला असून राज्य शासनाने त्यांना तात्काळ निलंबित करावे अन्यथा प्रजासत्ताक दिनाच्या वर्धापनदिनी २६ जानेवारी रोजी सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करणार आहे, असा इशारा पीपल्स रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष रमेश उबाळे यांनी गुरुवारी दुपारी दोन वाजता दिला आहे.

कोरेगाव येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखाली नवीन प्रशासकीय इमारत उभारण्यात आली आहे. या इमारतीमध्ये प्रांताधिकारी आणि तहसीलदार कार्यालय स्थलांतरित करण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता डी. ए. पाटील यांच्या चुकीच्या कार्यपद्धतीमुळे इमारतीचे काम अपूर्ण राहिले आहे. इमारतीच्या प्रवेशद्वारावरच असणारी राजमुद्रा खाली पडली होती तसेच तिथे संविधान उद्देशिका लावण्यात आलेली नव्हती, या बाबी निदर्शनास आल्यानंतर तात्काळ प्रांताधिकारी अभिजीत नाईक आणि तहसीलदार डॉ. संगमेश कोडे यांना निवेदन सादर करून आंदोलनाचा इशारा दिला होता. सार्वजनिक बांधकाम विभागाचे हे काम असताना आणि जबाबदारी असताना देखील उपअभियंता पाटील यांनी या विषयाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले नाही. एक महिनाभर त्यांनी या विषयात लक्ष न दिल्याने नाईलाजास्तव प्रांताधिकारी नाईक व तहसीलदार डॉ. कोडे यांनी स्वखर्चाने राजमुद्रा बसविली आणि संविधान उद्देशिका तेथे आणून लावली. एकूणच उपअभियंता पाटील यांच्या कार्यकाळात नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे. या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही. केवळ दोन्ही मजल्यांवर कुलर आणून ठेवण्यात आले आहेत, मात्र ते बसविले नाहीत. ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांना बसण्याची व्यवस्था नाही. दिव्यांग व्यक्तींना कार्यालयात येण्यासाठी रॅम्प तयार करण्यात आला आहे, मात्र त्यासाठी रस्ता तयार केलेला नाही. अशा अनेक गोष्टी या पाटील यांच्या जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे प्रलंबित राहिल्या आहेत, असा आरोप उबाळे यांनी केला आहे.

ज्या संविधानामुळे आपल्याला नोकरी मिळाली आहे, राज्य शासनाकडून पगार मिळत आहे. त्याची जाण उपाभियंता पाटील यांना राहिलेली नाही. त्यामुळे ते या पदावर राहण्यास पात्र नाहीत, त्यांना तात्काळ निलंबित करावे. त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा आणि त्यांना घरचा रस्ता दाखवावा, अशी विनंती उबाळे यांनी केली आहे. प्रशासनाने या संदर्भात दखल न घेतल्यास दि. २६ जानेवारी रोजी सातारच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करणार आहे, असा इशारा उबाळे यांनी दिला आहे.

अनुभव शिस्त आणि समर्पित रुपी असलेले मानवी भांडवल राष्ट्र निर्मितीसाठी महत्वपूर्ण योगदान देऊ शकतात; लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी

कराड ■ कुलदिप मोहिते

सातारा जिल्हा सैनिक फेडरेशन च्या वतीने लष्कर प्रमुखांचा सन्मान



कराड : सेना दिवसाचे औचित्य साधून सातारा जिल्हा सैनिक फेडरेशन चे अध्यक्ष प्रशांत कदम यांनी भारत सेना लष्कर प्रमुखांची पुणे येथे भेट घेतली आहे.

मंगळवार दि. १४/१/२०२५ रोजी सेना दिवस या निमित्ताने पुणे हेडकॉटर ४१ आर्टिलरी डिव्हिजन या ठिकाणी वेटरन्स लंच चे आयोजन करण्यात आले होते यावेळी लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी झ्न्एर्श्ँन्एश यांचा सन्मान सातारा जिल्ह्याच्या माजी सैनिकांच्या वतीने सैनिक संघटनेचे सन्मान चिन्ह देऊन प्रशांत कदम (माजी सैनिक) अध्यक्ष सैनिक संघटना, सातारा जिल्हा संरक्षण समिती सदस्य व माजी सैनिक यांनी केला आहे.

यावेळी लष्कर प्रमुख यांनी माजी सैनिक, त्यांचे कुटुंबीय, शहीद जवान कुटुंबीयांशी संवाद साधला आपल्या संवादा दरम्यान त्यांनी म्हटले आहे की विकसित राष्ट्र होण्यासाठी देश वाटचाल करत असताना माजी सैनिकांना राष्ट्रनिर्मिती साठी विविध क्षेत्रांमध्ये सहभागी करून घेणे शक्य आहे सैनिक समाजाची एकत्रित ताकद विचारात घेतल्यास २४ लाख माजी सैनिक, ७ लाख वीर नारी, २८ लाख कुटुंबीय, १२ लाख सेवारत सैनिक त्यांचे २४ लाख कुटुंबिय आणि इतर कुटुंबीय मिळवून इतकी मोठी लोकसंख्या तयार होते. अनुभव ,शिस्त ,आणि समर्पित असलेले हे मानवी भांडवल राष्ट्रनिर्मिती साठी महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकते माजी सैनिक बदलाचे आधारस्तंभ आणि देशाच्या परिवर्तनाचे राजदूत म्हणून काम करण्याची भूमिका बजाऊ शकतात भारतीय सैन्य राज्य सरकार समवेत काम करत आहे या प्रयत्नामध्ये माजी सैनिकांचा समावेश केल्याने राज्याच्या कामाला होणारा फायदा आणि योगदान याचे परस्पर पूरक नाते निर्माण करून याला पुढे नेण्याची गरज आहे यातून माजी सैनिक आणि राज्य सरकार यांचा दोघांचाही फायदा होऊ शकतो असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

संवेदनशील समाज निर्मितीमध्ये पत्रकारांचे कार्य कौतुकास्पद: संदेश केंजळे

शिरुर (पुणे) ■ शकील मनियार







शिरूर : द युवा ग्रामीण पत्रकार संघ शिरूर तालुका व पुणे जिल्हा आयोजित मराठी दिनदर्शिका २०२५ चे प्रकाशन व शिरूर व जुन्नर तालुका कार्यकारणी पदाधिकारी ओळखपत्र वाटप कार्यक्रम द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष मा.अन्सार शेख यांच्या शुभहस्ते तसेच द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे पुणे जिल्हाध्यक्ष शकीलभाई मनियार ,जिल्हा उपाध्यक्ष काशिनाथ आल्हाट जिल्हा कार्याध्यक्ष स्वरूप गिरमकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ . बाबासाहेब आंबेडकर सभागृह शिरूर या ठिकाणी मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.

मराठी दिनदर्शिका २०२५ चे प्रकाशन द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष अन्सार शेख, योगीराज उद्योग समूहाचे चेअरमन राहुलदादा करपे, शिरूर पोलिस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलिस निरिक्षक मा. संदेश केंजळे साहेब, द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राज्य सहसचिव विवेकानंद फंड, राज्य सदस्य संतोष कदम यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक संदेश केंजळे म्हणाले , 'आज समाजात घडत असलेल्या घटना प्रकर्षाने पोलीस स्टेशन पर्यंत आणण्याचे काम पत्रकार करीत असतात. पत्रकारितेमुळे समाजातील अनेक घटना कळतात आणि त्या घटनांना योग्य न्याय देण्याचे काम केले जाते पत्रकारांचे संवेदनशील समाज निर्मितीसाठी मोठे योगदान असून समाजाप्रती असलेली बांधिलकी इथून पुढच्या काळात देखील जोपासली जाण्याची इच्छा पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी व्यक्त केली . यावेळी राहुलदादा करपे म्हणाले की द युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचे कार्य खऱ्या अर्थाने कौतुकास्पद आहे तसेच पत्रकारांचा योग्य मानसन्मान आपण केला पाहिजे व भविष्यकाळात त्यांच्यापाठीमागे खंबीरपणाने उभे राहणार आहे.

यावेळी संस्थापक अध्यक्ष अन्सार शेख हे बोलताना म्हणाले की आमचे पत्रकार खऱ्या अर्थाने गोरगरीब ,वंचित घटक यांच्यासाठी काम करतात त्याचे प्रश्न मांडतात त्या पत्रकारांचा राज्यस्तरावर सन्मान होणे आवश्यक आहे पत्रकारांच्या प्रश्नांसाठी भविष्यात मी फार मोठे काम उभे करणार असल्याचे त्यांनी याप्रसंगी सांगितले

यावेळी अनेक मान्यवरांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीमध्ये खरेदी विक्री संघ अहिल्यानगर बाळासाहेब काळे, बहुजन मुक्ती पार्टी राज्य सहसचिव फिरोज सय्यद, मीडिया प्रमुख रोहित वाळके, महाराष्ट्राची भूमी संपादक आनंदा (आण्णा) बारवकर, राष्ट्रवादी काँग्रेस युवक शरदचंद्र पवार गटाचे तालुका उपाध्यक्ष राहुल कुल, शिवसेना तालुकाप्रमुख पोपट शेलार, तंटामुक्ती अध्यक्ष संतोष आरवडे ,चेअरमन संपत सोनवणे व्हॉइस चेअरमन संतोष लटांबळे, सिमाई फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सीमाताई पवार, आदर्श माजी सरपंच मंगलताई कौठाळे डॉ सुनिता पोटे मॅडम, माजी सरपंच राजेंद्र जाधव ,उद्योजक विठ्ठल परदेशी ,सरपंच आजिनाथ म्हस्के पत्रकार निलेश जगताप इत्यादी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी द युवा ग्रामीण पत्रकार संघाची शिरूर तालुका कार्यकारणी व जुन्नर तालुका कार्यकारिणी जाहिर करण्यात आली. यावेळी द युवा ग्रामीण पत्रकार संघ शिरूर तालुका अध्यक्ष विजय कांबळे, द युवा ग्रामीण पत्रकार संघ जुन्नर तालुका अध्यक्ष सचिन थोरवे, उपाध्यक्ष विश्वनाथ घोडके, उपाध्यक्ष भरत घावटे सचिव साहेबराव चव्हाण खजिनदार सुनील काटे सल्लागार नितीन मिसाळ संघटक संतोष काळे सरचिटणीस मच्छिंद्र काळे जुन्नर तालुका उपाध्यक्ष जयेश खांडरे सर्व पदाधिकारी यांना राज्य अध्यक्ष अन्सार शेख यांच्या शुभहस्ते सन्मान करून संघटनेमार्फत ओळखपत्राचे वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमानिमित्त सुत्रसंचालन शिरूर तालुका ग्रंथालय संघ अध्यक्ष विवेकानंद फंड व आभार विजय कांबळे यांनी मानले.

पूर्णवाद व्यायाम शाळेत क्रीडा दिन साजरा



बीड ■ गितांजली लव्हाळे

बीड :बीड जीवनरथ सारथी डॉ. पारनेरकर महाराज मंदिर ,कोतवाल गल्ली, पूर्णवाद व्यायाम शाळा ,बीड येथे क्रीडा भारती , छ्ध्द यांच्यावतीने ऑलिंपिक वीर पैलवान खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्त प्रथम ऑलम्पिक वीर पैलवान खशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन करून राज्य क्रीडा दिन साजरा करण्यात आला .योग, सूर्यनमस्कार क्षेत्रात विभागीय स्तरावर विशेष कामगिरी केल्याबद्दल उपसंचालक शिक्षण व क्रीडा युवक सेवा संचालनालय छ.संभाजीनगर यांच्या वतीने डॉ. डॉ .राजाभाऊ अर्सुळ ,डॉ. संजय तांदळे, डॉ. आनंदकुमार लिमकर, यांच्यासह सर्व खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन येथोचित सत्कार करण्यात आला.बीडचे वैभव संस्थान श्री गणेश जनार्धन पाटांगणकर महाराज यांच्या परंपरेतील मठाधिपती श्री विनायक महाराज पाटणकर व रामदासी परंपरेतील प्रा. डॉ. कृष्णा रामदासी ,ज्येष्ठ पत्रकार श्री. प्रमोद रावजी कुलकर्णी वेदमूर्ती श्री.विडेकर गुरुजी व जीवनरथ सारथी मंदिराचे संकल्पक , ज्येष्ठ पुनवादी उपाध्यक्ष अशोक काका वजे यांच्या उपस्थितीत मल्लखांब, जिम्नॅस्टिक, योगा प्रात्यक्षिक दाखवण्यात आली. यावेळी पालक विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजक विनायक वझे यांनी केले तर आभार सुभाषिनी वझे हिने मानले.

राष्ट्रीय एकात्मता देश पातळीवरील शिबिरास कुमारी शुभांगी प्रसाद काकडे व कुमारी पल्लवी गजानन काटकर याची निवड

परभणी ■ अरविंद कांबळे



पूर्णा.श्री गुरु बुद्धीस्वामी महाविद्यालय अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागातील दोन स्वयंसेविकाची राष्ट्रीय एकात्मता शिबिर मैसूर (कर्नाटक) येथे निवड झाली आहे .कु. शुभांगी प्रसाद काकडे व कु.पल्लवी गजानन काटकर,(ँ.एण.छ्छर्भी) दिनांक १६ ते २२ जानेवारी या कालावधीत राष्ट्रीय एकात्मता शिबिर (ऱ्छ्ण)एन. एस .एस .भवन सरस्वतीपुरम ,मैसूर बेंगलोर ,कर्नाटक येथे सहभागी होत आहेत

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातून एनएसएसच्या एकूण दहा स्वयंसेवकांची निवड करण्यात आली होती ,त्यामध्ये पाच मुले व पाच मुली यापैकी महाविद्यालयातून दोन स्वयंसेविका यांची या शिबिरा करिता निवड झाली. या सात दिवशी शिबिरामध्ये स्वयंसेवक महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून सादरीकरण करतात. शिबिरामध्ये एकूण १० राज्यातील १०० विद्यार्थी सहभागी होतात .प्रत्येक स्वयंसेवक हा आपल्या राज्यातील कला, संस्कृती, परंपरा ,भाषा ,पोशाख याबाबत सांस्कृतिक कार्यक्रमातून माध्यमातून सादरीकरण करत असतात. त्याचबरोबर त्यांना हिंदी व इंग्रजी भाषेचे भाषेचे ज्ञान त्यांना उत्तम प्रकारे अवगत असते . महाराष्ट्र राज्यातील लोकांचा पोशाख , येथील भाषा, परंपरा आहे हे त्यांच्या कलेतून एकदम उत्तम प्रकारे सादरीकरण करून महाराष्ट्र राज्याचे त्या ठिकाणी दर्शन घडवून आणतात. प्रत्येक राज्यातील स्वयंसेवक हा आपल्या राज्यातील कला,संस्कृती, तेथील पोशाख ,परंपरा यांचे सादरीकरण करत असतात. या सात दिवशी शिबिरा दरम्यान प्रत्येक स्वयंसेवक एकमेकांसोबत संवाद साधून वेगवेगळया राज्यातील पोशाख परिधान करून सादरीकरण करतात. राष्ट्रीय एकात्मता शिबिरा दरम्यान सात दिवसांमध्ये त्यांच्या विचारातील देवाणघेवाण तेथील संस्कृती परंपरा ,कला याबाबत ओळख करून त्यांना इतर राज्यातील युवकांमध्ये वैचारिक पातळीवर समाविष्ट होऊन त्यांच्या जीवनासाठी व समाजासाठी खूप काही शिकण्यात येतं व उपयोगी असे विचार रुजले जातात . शासनाचे उद्दिष्ट एकात्मता सहवासातून निर्माण व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे आयोजन करण्यात येते.

या निवडीबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्रमोद एकलारे, सचिव अमृतराज कदम कोषाध्यक्ष उत्तमराव कदम, सहसचिव गोविदराव कदम तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के. राजकुमार, उपप्राचार्य डॉ शिवसांब कापसे यांनी अभिनंदन केले आहे . राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. पुष्पा गंगासागर ,डॉ. अजय कुर्रे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले आहे

शेतकऱ्यांच्यावतीने लोकशाही पत्रकार संघटनेच्या नूतन कार्यकारिणीचा सत्कार शेतकरी नेते संतोष पाटील जाधव यांनी गंगापूरला पंचायत समिती कार्यलयात केला सत्कार

दै, जनप्रभात गंगापूर प्रतिनिधी ■ सुनिल झिजुर्डे पाटील



गंगापूर : लोकशाही पत्रकार संघटनेची गंगापूर तालुक्याची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली या तालुका नूतन कार्यकारिणीचा शेतकऱ्यांच्यावतीने शेतकरी नेते तथा जिल्हा परिषदचे माजी बांधकाम सभापती संतोष पाटील जाधव यांच्या वतीने गंगापूर पंचायत समिती कार्यालयात दि. १६ जानेवारी गुरुवारी रोजी शाल श्रीफळ भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार गुलाब वाघ यांनी केले यावेळी प्रताप साळुंके,तालुकाद्यक्ष अमीन पटेल, तालुकाउपाद्यक्ष ज्ञानेश्वर अमृते,तालुका सचिव गोकुळ लांडे यांच्यासह अन्वर बागवान,जयेश निरफळ, रामेश्वर अमृते,धनंजय ठोंबरे,गुलाब वाघ,जमील पठाण,खलील पटेल,अमोल शिंदे,विठ्ठल मस्के,सोमनाथ शिंदे,राजू जाधव,सुनील झिजूर्डे,फेरोज मन्सूरी,सलीम सय्यद आदिचाही सत्कार करण्यात आला.

पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून गंगापूर तालुक्यामध्ये शेतकरी शेतमजूर यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यात कायम पुढे असतो त्यामुळे लोकशाही पत्रकार संघटनेच्या नूतन कार्यकारिणीचा सत्कार समारंभ तालुकाभारतील शेतकऱ्यांच्यावतीने आज गंगापूरात करण्यात आला यापुढे लोकशाही पत्रकार संघटनेने शेतकरी शेतमजूर यांच्यावर होणाऱ्या अन्यायविरुद्ध संघटनात्मक दबाव प्रशासनावर आणण्यासाठी प्रयत्न करावा असे आवाहनही पत्रकारांना संतोष पाटील जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक करताना केले.

संतोष पाटील जाधव मा. बांधकाम सभापती)

अध्यात्मिक प्रगतीत सुख प्राप्त होते : महंत श्रीराम महाराज विडेकर

'विडा येथे साधू शिवरामपुरी पुण्योत्सव मोठ्या उत्साहात संपन्न'

केज ■ तात्या गवळी



केजः संसारिक प्रगती अस्थिर, क्षणभंगुर असून मानवी जीवनाचा सर्वोत्तम लाभ हा आध्यात्मिक प्रगती आहे असून साधकांनी ती मिळवण्याचा प्रयत्न करावा असे प्रतिपादन ह. भ. प. महंत श्रीराम महाराज विडेकर यांनी केले ते विडा येथे परंपरेने चालत आलेल्या श्री तपोनिधी साधू शिवराम पुरी महाराजांच्या पुण्योत्सव सप्ताहाच्या काल्याच्या किर्तनप्रसंगी बोलत होते याप्रसंगी त्यांनी

गोकुळीच्या सुखा अंतपार नाही लेखा बाळकृष्ण नंदाघरी आनंदल्यक नरनारी गुढिया तोरणे करती कथा गाती गाणे तुका म्हणे छंदे येणे वेधिले गोविंद दे या जगदुरु तुकाराम महाराज यांच्या कृष्ण जन्म पर अभंगावर निरूपण केले याप्रसंगी त्यांनी श्रीकृष्णाच्या जन्मामुळे गोकुळातील सुखाला अंतपार नव्हता,नंदाच्या घरी बाळकृष्ण जन्मल्यामुळे सर्वांना आनंद झाला त्यामुळे त्यांनी गुढिया तोरणे उभारून बाळकृष्णाचे स्वागत केले व हरि गुण गात होते आणि कृष्णाच्या या बाललीलांना सर्वांना मोहित करून टाकले होते यानंतर त्यांनी गोकुळातील बालकृष्णाच्या लीलांचे सविस्तर वर्णन केले त्याचबरोबर कलियुगामध्ये साधू थोर असून या विडागावी साधूची थोर परंपरा आहे येथे तपोनिधी ते साधू शिवरामपुरी महाराजांची इथे संजीवन समाधी असून तिला खूप मोठे अध्यात्मिक महत्व आहे याच परंपरेतील सद्गुरु नागनाथ महाराज व प.पु रामकृष्ण महाराज यांच्या उपदेशाने अनेक साधवकांचे जीवन सुखर झाले असून त्यामुळे त्यांच्या जीवनात भौतिक सुखाबरोबरच आध्यात्मिक सुख प्राप्त झाले असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाला केज विधानसभेचे ज्येष्ठ नेते नंदकिशोरजी मुंदडा,बाजार समितीचे सदस्य विलास आप्पा जोगदंड, सुनील महाराज, पुरुषोत्तम महाराज, गोपीनाथ महाराज, अरुण महाराज कदम, मनोज देव, दादा महाराज मेटे, परमेश्वर महाराज, शिवराम महाराज, दीपक महाराज मेटे, राजाराम महाराज लहुरीकर, लक्ष्मणराव काकडे, ढोकीकर दादा, धैर्यशील देशमुख, सरपंच सुरज पटाईत, सकाळचे पत्रकार दत्ता देशमुख, प्रा. जगन्नाथ पटाईत, श्रीमंत भोसले, विटेकर महाराज, भागवत वरकड, आदी मान्यवर उपस्थित होते. काल्याची महाप्रसाद पंगत श्री ढोबळे यांची होती या सप्ताहात काकडा भजन विष्णू सहस्त्रनाम ज्ञानेश्वरी पारायण गाथा भजन प्रवचन हरिपाठ आणि हरिकीर्तन अशी उपक्रम संपन्न झाले रात्र ठीक ८ ते ११ या दरम्यान साधू शिवरामपुरी महाराज यांची भव्य पालखी मिरवणूक झाली पालखी मार्गावर महिलांनी रांगोळया काढून पालखी मार्ग सुशोभित केला होता या पालखी मिरवणुकीत अरुण महाराज कदम व पुरुषोत्तम शास्त्री यांच्या गुरुकुलातील शिष्यगणांनी सहभाग घेऊन पावले फुगडी रिंगण आधी खेळ मोठ्या उत्साहात पार पाडले शेवटी पालखीचे मंदिरात आगमन होऊन आरती आणि प्रसाद वाटप होऊन कार्यक्रमाची सांगता झाली कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी बाबासाहेब पटाईत, दिलीप देशमुख, उद्धव आप्पा, दिलीप भाऊ, बळीराम बप्पा सह सर्व सदभक्त व नागरिकांनी परिश्रम घेतले.

पारधी आणी भिल समामाज शासकीय सवलतीपासून वंचित राहिला :नामदेव भोसले

नायगाव येथे आदिवासीसाठी कॅम्प चे आयोजन

सातारा ■ जीवन मोहिते



साताराः आदिवासी समाजसेवक नामदेव भोसले यांच्या मागणीची दखल घेऊन पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार व पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुंडी यांच्या मार्गदर्शनाखाली हवेली तालुक्यातील रहीवासी असलेले आदिवासी पारधी बांधव व आदिवासी भिल समाज यांचा एक स्वतंत्र कॅम्प शुक्रवार दि. १७ जानेवारी २०२५ रोजी नायगाव येथे आयोजित केला आहे. या कार्यक्रमासाठी हवेली तालुक्यातील सर्व आदिवासी बांधवानी उपस्थित रहावे.

या विषयी आज आदिवासी समाजसेवक व साहित्यिक नामदेव भोसले यांच्या निवास्थानी आदिवासी परीवर्तनाची पाठशाळा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सरद या दि. १७ जानेवारी २०२५ रोजी नायगाव येथे, हवेली तालुक्यातील आदिवासी पारधी समाज व आदिवासी भिल समाज याचा शासकीय कॅम्प घेण्यात येणार आहे. या कार्यक्रमाध्ये जातीचे दाखले, रेशनिंग कार्ड, आधार कार्ड, उत्पन्नाचे दाखले, असे विविध शासकीय कागदपत्रे या कॅम्पमध्ये वाटप करण्यात येणार आहेत.. या कार्यक्रमासाठी सर्व आदिवासीनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे. असे आव्हान हवेली चे उपविभागीय दंडांधिकारी यशवंतराव माने यांनी केले आहे. सदर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी नामदेव भोसले यांच्या घरी बैठक घेण्यात आले या वेळी हवेलीचे उपविभागीय दंडांधिकारी मा.यशवंत माने , हवेलीचे तहसीलदार किरण सुर्यवंशी, हवेलीचे अप्पर तहसीलदार तृप्तीताई कोलते, गटविकास अधिकारी भुषण जोशी, मंडल अधिकारी गीताश्री काळे, तलाठी महादेव भारती, पोलीस पाटील अर्जुन पवार, आदर्श माता शेवराई ज्ञानदेव भोसले, तुकाराम भोसले उपस्थित होते.

धर्मगुरू डॉ. बाबूसिंग महाराज(आमदार, विधान परिषद) यांच्या हस्ते श्री अर्जुन चव्हाण यांना राष्ट्रीय गोर बंजारारत्न पुरस्कार २०२५ देऊन गौरव

बीड ■ गितांजली लव्हाळे



बीड : दिनांक ११-०१-२०२५ रोजी धर्मतपस्वी डॉ. रामराव महाराज राष्ट्रीय बंजारा फेडरेशन भारत या राष्ट्रीय संस्थेच्या वतीने बंजारा समाजातील सामाजिक, शैक्षणिक,सांस्कृतिक,कला क्रीडा वेगवेगळया क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तीला राष्ट्रीय स्तरावरील सर्वोच्च पुरस्कार राष्ट्रसंत डॉ.रामराव महाराज राष्ट्रीय गोर बंजारा रत्न पुरस्कार देऊन सन्मान केला जातो... श्री अर्जुन चव्हाण कृषी पर्यवेक्षक शासकीय अन रोपवाटिका राजुरी नवगण तालुका जिल्हा बीड.. यांची कृषी क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना नुकताच पद्मश्री कृषी सेवा रत्न पुरस्कार राज्याचे महामंडळ राज्यपाल श्री सीपी राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले होते.. या कार्याची दखल घेऊन त्यांची राष्ट्रसंत डॉ. रामराव महाराज राष्ट्रीय गोर बंजारा रत्न पुरस्कार २०२५ या पुरस्कारासाठी निवड झाली... दिनांक ११ १ २०२५ रोजी वार शनिवार जगातील बंजारा समाजाची काशी गोरधर्म पीठ उमरीगड रोड पोहरादेवी या ठिकाणी बंजारा समाजाचे दैवत संत सेवालाल महाराज पोहरागड पिठाचे जागतिक धर्मगुरू डॉ. बाबूसिंग महाराज(विधान परिषद सदस्य महाराष्ट्र राज्य), गोरबंजारा धर्मपिठाचे महंत जितेंद्र महाराज, महंत सुनील महाराज, महंत कबीरदास महाराज व देशातील सर्व महंत यांच्या उपस्थितीत श्री अर्जुन चव्हाण,कृषी पर्यवेक्षक यांचा सहपत्नीक शाल, पुष्पगुच्छ, सन्मानपत्र व सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला.... यावेळी राष्ट्रीय संस्थेचे प्रमुख श्री विजय नायक राठोड त्यांनी कार्यक्रमाच्या प्रस्ताविकास २९ राज्य मध्ये गोर बंजारा बांधवांच्या प्रगती बाबत माहिती दिली. २०२५ मध्ये २९ राज्यातील २० व्यक्तींना राष्ट्रसंत डॉ. रामराव महाराज राष्ट्रीय गोर बंजारा रत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे असे सांगितले.. बंजारा समाजाचे धर्मगुरू डॉक्टर बाबुसिंग महाराज यांनी या संस्थेच्या कार्याची प्रशंशा करून देशातील सर्व बंजारा बांधवांना एका ठिकाणी जोडण्याचे काम ही संस्था करत आहे असे सांगून वेगवेगळया राज्यातून आलेल्या बंजारा समाजातील सर्व वेगवेगळया क्षेत्रातील बांधवांना संत सेवालाल महाराज यांच्या कार्याची माहिती दिली. राष्ट्रसंत डॉक्टर रामराव महाराज राष्ट्रीय गोर बंजारा पुरस्कार मिळालेल्या सर्व सत्कारमूर्तीचे अभिनंदन केले. तसेच श्री अर्जुन चव्हाण यांनी महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या सेवेत राहून उत्कृष्ट कार्य केले आहे.. कृषी व समाजाचे कार्य त्यांच्या हातून कायम होत राहील यासाठी आशीर्वाद दिले... गोरधर्म पिठाचे महंत जितेंद्र महाराज यांनी भारतातील सर्व गोर बंजारा बांधव एकत्र येऊन वेगवेगळया क्षेत्रातील कार्याबद्दल त्यांचा सन्मान होतो.. ही बाब समस्त गोर बंजारा साठी कौतुकास्पद आहे.. याचा आमच्या महंत व सर्व धर्मगुरूंना अभिमान वाटतो असे सांगितले... वेगवेगळया क्षेत्रात काम करणाऱ्या सर्वच समाजसेवक बांधवांनी समाजाच्या प्रगतीसाठी झटावे असे सांगितले.... श्री अर्जुन चव्हाण यांच्या कृषी क्षेत्रातील कार्याबद्दल या मिळालेल्या पुरस्कारासाठी बीड जिल्ह्यातून वसंतराव नाईक अधिकारी कर्मचारी संघटनेचे श्री बाबासाहेब चव्हाण,प्राध्यापक डॉक्टर जगन्नाथ चव्हाण मुख्याध्यापक श्री शिवाजी जाधव,कृषी पर्यवेक्षक लहू चव्हाण,माध्यमिक शिक्षक गोरख जाधव कृषी पर्यवेक्षक राजेंद्र सांगळे, इंजिनीयर अतुल चव्हाण, बंजारा समाजाचे नेते श्री अंकुश राठोड,प्राचार्य राजेश कुमार राठोड,विमा सल्लागार श्री राजेश जाधव,परमेश्वर जाधव, सेल टॅक्स ऑफिसर राजेंद्र राठोड,वरिष्ठ प्रशासन अधिकारी संजय चव्हाण, लिपिक अविनाश राठोड,युवा नेते कैलास जाधव, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर पृथ्वीराज जाधव, संदीप राठोड, सेवानिवृत्त कृषी अधिकारी विष्णू जाधव,चव्हाण व जाधव परिवारातील ज्येष्ठ मार्गदर्शक,गुरुवर्य व कुटुंबातील सर्व सदस्य कार्यक्रम स्थळी उपस्थित होते.

मैत्रा फाउंडेशनचा शिक्षण महर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार गंगाधर डवरे यांन जाहीर

१९ तारखेला शहरातील सामाजिक न्याय भवनात होणार वितरण

बीड ■ गितांजली लव्हाळे



बीड बीड वडवणी :येथील सामाजिक क्षेत्रात कार्यरत मैत्रा फाऊंडेशन दरवर्षी विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना शिक्षण महर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मान करते. यावर्षीचे पुरस्कार नुकतेच जाहीर झाले असून वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा चिंचाळा येथील प्राथमिक शिक्षक गंगाधर हरी डवरे यांना जाहीर झाला आहे त्यामुळे डवरे यांचा सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

डवरे यांनी वडवणी तालुक्यातील सतेवाडीच्या अतिशय ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १२ वर्षे तर जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा चिंचाळा येथे मागील ५ वर्षापासून वेगवेगळे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना आनंददायी व गुणवत्तापूर्ण शिक्षण देत आहेत.

डवरे यांनी कोरोना काळात स्वतःचे ज्ञानगंगा यूट्यूब काढून विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण देऊन त्यांचे शैक्षणिक नुकसान टाळले. याशिवाय राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे मार्फत दर्जेदार व्हिडिओ निर्मिती स्पर्धेमध्ये तालुकास्तरीय प्रथम क्रमांक मिळविला तर जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला.

त्यांचे शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक कार्यामध्येसुद्धा योगदान राहिले आहे. स्वतःच्या प्रत्येक वाढदिवशी ते स्वतःहून रक्तदान करतात. जुण्या व नवीन नाणी व नोटाचा संग्रह करणे हा त्यांचा छंद असू त्यांच्या शैक्षणिक तसेच सामाजिक कार्याची दखल घेऊन यावर्षीचा महर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार त्यांना जाहीर झाल्याची माहिती निवड समितीचे प्रमुख तथा मैत्रा फाउंडेशनचे संस्थापक द.ल.वारे, जिलाध्यक्ष संजय राठोड यांनी दिली.

सदर पुरस्काराचे वितरण १९ जानेवारी रोजी शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असून मैत्रा फाउंडेशनचे वडवणी तालुकाध्यक्ष धनवे सर, सहकारी बरडे सर, प्रभाळे सर, मुख्याध्यापक मुंडे सर, जेष्ठ शिक्षिका असलेकर मॅडम, यासह सर्व शिक्षक, मित्रपरिवार आणि हितचिंतकांनी त्यांचे अभिनंदन केले असून पुरस्कार वितरणासाठी सर्व मित्रपरिवाराने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शैक्षणिक संस्था, धार्मिक स्थळे, उद्योग, प्रतिष्ठाणे ही समाजसेवेची साधन व्हावीत: सुधीर दिवे

कारंजा (घा.) ■ सिध्दार्थ सोमकुवर



वर्धा - कारंजा(घा): दि. १४:- कोणत्याही संत, महापुरुषाची जयंती, पुण्यतिथी अथवा प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वाचे वाढदिवस हे नियमित कार्यक्रमासह आरोग्य शिबिरा सारख्या सामाजिक कार्याने साजरे करावेत असे मत श्री संत अच्युत महाराज हॉस्पिटलचे उपाध्यक्ष तथा भाजपा नेते सुधीर दिवे यांनी कारंजा(घा) येथील आयोजित हृदयरोग निदान शिबिरात व्यक्त केले सदर शिबीर गुरुकुल पब्लिक स्कूल, श्री. संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल आणि ग्रामीण रुग्णालय कारंजा (घा) यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांच्या जयंती निमित्ताने आयोजित होते यावेळी मंचावर हॉस्पिटलचे सचिव सागर पासेबंद, संपदा पासेबंद, गुरुकुल चे अध्यक्ष शरद बोके, सचिव अजय भोकरे, दिगंबर साहेब, डॉ. श्रीराम राठी, प्रज्ञा मनवर, अधीक्षक डॉ. स्मिता किरणाके, डॉ. अभय तिडके, डॉ. चिन्मय, डॉ. प्रवीण ढोले, डॉ. ठोसर, डॉ. प्रल्हाद गुल्हाने, डॉ हितेंद्र वाघ, डॉ. अमोल चाफले, डॉ. भट्टड उपस्थित होते पुढे बोलतांना दिवे म्हणाले की, हृदयरोगाचे लक्षण असल्यास तज्ञाच्या मार्गदर्शनात योग्य उपचार केल्यास रुग्णाला दिलासा मिळतो आर्वी, आष्टी आणि कारंजा तालुक्यातील केव्हा ही हृदय रुग्ण हार्ट अटॅकने दगावणार नाही तेव्हाच मला परमोच आनंद होईल शिवाय परिसरातील शैक्षणिक संस्था, धार्मिक, उद्योग, प्रतिष्ठाणे स्थळे समाजसेवी व्यक्तिमत्त्वांनी यात सहभाग घेणे महत्त्वाचे आहे असे मनोगत व्यक्त केले यावेळी इतरही मान्यवरांनी आपापली मते व्यक्त केली.

श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल द्वारा वर्धा जिल्ह्यातील आर्वी, आष्टी, कारंजा तालुक्यात मागील दोन महिन्यात हृदय रोग निदान शिबिरे घेण्यात आले. त्यामुळे आर्वी, आष्टी, कारंजा या परिसरातील जवळ जवळ १००० लोकांची हृदय रोग तपासणी करण्यात आली आहे.

आष्टी येथे ९ डिसेंबर २०२३ रोजी जनशक्ती संघटने यांच्या संयुक्त विद्यमाने कॅम्प घेण्यात आला होता त्यावेळी ३७० रुग्णाची तपासणी करण्यात आली होती व ३९ रुग्ण हे अँजिओग्राफी करीत हॉस्पिटल ला पाठविण्यात आले होते, तसेच आर्वी येथे दिनांक २५ डिसेंबर २०२३ रोजी श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंती निमित्याने रोटरी क्लब ऑफ कॉटन सिटी, यांच्या संयुक्त विद्यमाने हृदय रोग निदान शिबिर घेण्यात आले होते यावेळी २७० रुग्णाची तपासणी करण्यात आली होती व २९ रुग्ण हे अँजिओग्राफी करीत हॉस्पिटल ला पाठविण्यात आले होते. तर कारंजा (घा) येथे घेण्यात आलेल्या शिबिरात ३१७ रुग्णाची तपासणी करण्यात आली व ३२ रुग्ण हे अँजिओग्राफी साठी हॉस्पिटला पाठविण्यात आले. त्यामुळे मागील दोन महिन्यात या तीन शिबिराचे माध्यमातून जवळ जवळ १०० रुग्णांना हार्ट अटॅक येण्यापूर्वीच त्याचेवर उपचार करण्यात आले हे या शिबिराचे फलित आहे. असे हि दिवे यांनी सांगितले.

अशोक सुपारे यांचा उल्लेखनिय कार्याबाबत पत्रकार संरक्षण समितीकडून सत्कार

देवळी ■ सौ.आरती गोसटकर/कारंजेकर



देवळी: पत्रकार संरक्षण समिती महाराष्ट्र राज्य च्या वतीने अल्लीपूर येथील समाजसेवक अशोक लक्ष्मनराव सुपारे यांचा सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याबाबत सत्कार करण्यात आला. सुपारे यांचा नेहमी सामाजिक कार्यात सहभाग असतो. त्यांच्या कार्याची दखल पत्रकार समितीकडून घेण्यात येऊन त्यांचा सपत्नीक बाळशास्त्री जांभेकर जयंतीदिनी माजी खासदार रामदास तडस यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह, शाल श्रीफळ, व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

पत्रकार संरक्षण समिती महाराष्ट्र राज्य वर्धा जिल्हा समितीच्या सत्यनारायण बजाज वाचनालय मगनवाडी वर्धा येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात जिल्ह्यातील उत्कृष्ट पत्रकार व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी खासदार रामदास तडस उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेशवर, शेतकरी नेते विजय जावंधिया, ज्येष्ठ समाजसेवक मोहन अग्रवाल, नागपूर येथील लोकमतचे वरिष्ठ पत्रकार नरेश डोंगरे, कस्तुरबा हॉस्पिटल सेवाग्रामचे प्रशासकीय अधिकारी डॉ. गिरीश देव, संस्थापक अध्यक्ष पत्रकार संरक्षण समितीचे विनोद पत्रे, समाजसेवक इम्रान राही, ज्येष्ठ पत्रकार राजू गोरडे, विदर्भ उपाध्यक्ष रविराज घुमे, जिल्हा कार्याध्यक्ष शेख सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सतिश काळे, संचालन ग्रामीण संदिप रघाटाटे, तर आभार प्रदर्शन शशांक चतारे यांनी केले.

गौळ येथे लोक सहभागातून उभारला वनराई बंधारा शेतकऱ्यांना होणार ओलीताचा फायदा

देवळी ■ सौ.आरती गोसटकर/कारंजेकर



देवळी: पाणी फाउंडेशन व देवळी कृषि विभागांतर्गत गौळ येथील संघर्ष शेतकरी गट व नाचणगांव येथील यशस्वी गट या दोन्ही गटातील सदस्यानी मौजा अडेगाव शिवारातील स्मशानभूमी जवळील नाल्यावर वनराई बंधारा तयार करण्यात आला. या गटातील सदस्यांनी खतांच्या गोण्यामध्ये रेती, माती भरून वनराई बंधारा त्या करण्यात आला.

या बंधाऱ्यातील पाण्याचा उपयोग या शिवारातील अडेगाव, गौळ, कृष्णापूर क्षेत्रावरील हरभरा, गहू पिकाना संरक्षित पाणी देण्यासाठी होणार आहे. तसेच या गावातील ग्रुांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होणार आहे. व खालच्या क्षेत्रातील विहिरिंच्या पाण्याची पातळी वाढणार आहे.

हा वनराई बंधारा बांधण्यासाठी गौळ येथील संघर्ष बचतगट, नाचणगांव येथील यशस्वी बचतगट पाणी फौंडेशन अंतर्गत कार्यरत नाचणगांव येथील उमेदच्या सिआरपी योगीता सोनवणे कृषिअधिकारी कार्यालय देवळी येथिल कृषि पर्यवेक्षक प्रशांत चव्हाण, कृषी सहाय्यक दिनेश कळसकर, संतोष बुधवंत, पाणी फाऊंडेशनचे राम अंभुरे, गावातील माजी उपसरपंच मनोज नागपुरे, नाचणगांव येथील उमेदच्या सिआरपी योगीता सोनवणे उपस्थित होत्या. वनराई बंधारे बांधणे का गरजेचे आहे हे उपस्थितांना समजावून सांगून एकजुटीने हा बंधारा बांधण्याचे काम यशस्वी झाले.

तायवाडे महाविद्यालयात ' युथ फॉर हॅप्पीनेस 'या विषयावर पाच दिवसीय कार्यशाळेचा यशस्वीरित्या समारोप

कोराडी ■ दिलीप येवले



कोराडी : तायवाडे महाविद्यालय महादुला - कोराडी येथील राष्ट्रीय सेवा योजना, करिअर कट्टा व आर्ट ऑफ लिविंग, नागपुर यांच्या संयुक्त विद्यमाने ' युथ फॉर ह?पिनेस ' या विषयावर पाच दिवसिय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या समारोपिय कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शरयु तायवाडे तर प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून डॉ. अम्रिता सेठी व अ?डव्होकेट स्वप्निल जाधव, आणि राष्?ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी व राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. वकील शेख, राष्?ट्रीय सेवा योजना सहकार्यक्रम अधिकारी डॉ. किशोर घोरमाडे मंचावर उपस्थित होते.

या कार्यशाळेमध्ये आर्ट ऑफ लिव्हींग, नागपूरच्या समन्वयक डॉ अम्रिता सेठी आणि अँड. स्वप्निल जाधव यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. ध्यान हा मानसिक तनाव कमी करण्यात कार्य करतो म?हणून विशेषज्ञानी उपस्थित विद्यार्थी आणि शिक्षकांकडून ध्यानाचा अभ्यास करून घेतला. आणि मानसिक स्वास्थाशी निगडित मुद्यांवर माहिती देण्यात आली. विशेषज्ञांनी सांगितले की डिजीटल वर्ल्ड सोबत मल्टीटास्किंग च्या जीवनात दहा कामे सोबत करण्याची सवय आपल्याना जडलेली आहे हिच सवय आपल्या मानसिक स्वास्थासाठी खुपच घातक आहे. जोपर्यंत आपण आपल्या मनावर नियंत्रण ठेऊ शकणार नाही, तोपर्यंत आपले वर्तमान आणि आपले भविष्य चांगले होणार नाही यासाठी या कार्यशाळेमध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. जसे सूर्यनमस्कार, प्राणायम, सुदर्शन क्रिया आणि विविध क्रियाकलाप घेण्यात आल्या. तरुणांमध्ये मनशांती, एकाग्रता, आत्मविश्वास कसा वाढवावा, ज्यामुळे ते एक यशस्वी व्यक्ती बनु शकेल यावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. ध्यान तनाव कमी करण्यास कसे कार्य करतो, त्यामुळे आपले मानसिक स्वास्थ चांगले राहते. म्हणून ध्यान हे मानसिक स्वास्थासाठी किती महत्वाचे आहे हे विस्तारीतपणे समजून सांगण्यात आले. आपल्या भावना, आनंद आणि प्रतिकारशक्ती कशी वाढवायची यांवर भर दिला गेला.

या कार्यशाळेचे सुत्रसंचालन प्रा. प्रिती भोयर आणि आभारप्रदर्शन प्रा. अभिजित दरवाडे यांनी केले. आणि ही कार्यशाळा अतिशय चांगल्या प्रकारे घेण्यात आली असे या कार्यशाळेत सहभागी विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. समारोपिय कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागी विद्यार्थी व प्राध्यापकांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

गावात पोकरा प्रकल्प राबविण्यासाठी सरपंच महत्वाचा दुआ: उपविभागीय कृषी अधिकारी वैष्णवी शिंदे यांचे प्रतिपादन

वर्धा येथील ग्रामोपयोगी विज्ञान केंद्रात पोकरा प्रकल्प सरपंच प्रशिक्षणाचे उदघाटन

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : वर्धा येथील ग्रामोपयोगी विज्ञान केंद्रात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) टप्पा-२ साठी जिल्ह्यातील निवडक ग्रामपंचायतींच्या सरपंचांचे प्रशिक्षण सुरू झाले आहे. या प्रशिक्षण उदघाटनाला वर्धा उपविभागाच्या उपविभागीय कृषी अधिकारी वैष्णवी शिंदे यांची उदघाटक म्हणुन उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून वर्धा उपविभागाचे कृषी पर्यवेक्षक राजेश अंबुलकर तर सत्र समन्वयक प्रज्ञा विवेक चहांदे आणि प्रविण प्रशिक्षक विनेश काकडे मंचावर उपस्थित होते.

यावेळी वर्धा जिल्ह्यातील निवडक गावात पोकरा प्रकल्प राबविण्यासाठी सरपंच हा महत्वाचा दुआ असल्याचे प्रतिपादन उपविभागीय कृषी अधिकारी वैष्णवी शिंदे यांनी केले. राज्य सरकारने जागतिक बॅंकेच्या सहकार्याने आणि केंद्रशासनाच्या माध्यमातून नानजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ साठी ६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. वर्धा जिल्ह्यातील निवडक ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. यामध्ये वैयक्तिक लाभाच्या योजना, सामुहिक लाभाच्या योजना असल्याने हा प्रकल्प राबविण्यासाठीच सरपंच हा महत्त्वाचा दुवा आहे. या अनुषंगानेच पोकरा प्रकल्प टप्पा-२ चे प्रशिक्षण वर्धा जिल्ह्यातील निवडक ग्रामपंचायतींच्या सरपंचांना दिले जात आहे.

कार्यक्रमाचे संचालन सत्र समन्वयक प्रज्ञा विवेक चहांदे यांनी तर प्रास्ताविक करून आभार प्रविण प्रशिक्षक शारदा धनवीज यांनी मानले आणि रीतसर प्रशिक्षण सुरू करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील आर्वी, आष्टी, कारंजा आणि हिंगणघाट तालुक्यातील निवडक ग्रामपंचायतींचे सरपंच उपस्थित होते.

चक्रवर्ती राजा भोज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम संपन्न

कारंजा (घा.) ■ सिध्दार्थ सोमकुवर



कारंजा (घाडगे): स्थानिक चक्रवर्ती राजाभोज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत १२ जानेवारी रोजी स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त युवा दिन साजरा करून उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम घेण्यात आला. सोबतच राजमाता जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम घेण्याचे आदेशित करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमात संस्थेमधून उत्तीर्ण झालेले व स्वतःचा व्यवसाय करणारे उद्योजक म्हणून सुरज नेहारे, धीरज ढोक, सचिन डोबले, सानिका ढोबाळे यांचे प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. नुकत्याच संस्थास्तरावर पार पडलेल्या तंत्र प्रदर्शनी मध्ये प्रथम, दुतीय क्रमांक देऊन अभियांत्रिकी गटात गौरव थांदे, साहिल पिपळकर, निखिल बोडखे, पंकज केवटे तसेच बिगर अभियांत्रिकी गटात मयूर मडके, हर्षल खंते आणि नावीन्यपूर्ण गटात सुचिता फंदी यांची निवड करून जिल्हा पातळीवर पाठवण्यात आलेत. वर्धा येथून त्यांना नावीन्यपूर्ण गटात दुतीय क्रमांक पटकवून विभागीय स्तरावर निवड झाल्याबद्दल शिल्प निर्देशक साने मॅडम व प्रशिक्षणार्थीचे संस्थेचे प्राचार्य कृष्णापूरकर यांनी अभिनंदन केले. तहसीलदार अश्वयागिरी यांच्या हस्ते सर्वांना प्रमाणपत्र देऊन अभिनंदन केले.

उद्योजकता प्रेरणा कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून डॉ. सतीश ढोके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर अध्यक्ष म्हणून तहसीलदार ऐश्वर्या गिरी यांची उपस्थिती होती 'प्रत्येक घरामध्ये यशस्वी उदयोजक निर्माण झाले पाहिजे जेणे करून आपण रोजगार करणारे नाही तर रोजगार देणारे होऊया ' असा संदेश त्यांनी दिला.

संस्थेचे सर्वसाधारण प्राचार्य एस. आर. कृष्णापुरकर, मॉडेल हायस्कूलचे सहाय्यक शिक्षक विनोद चाफले, चक्रवर्ती राजा भोज समितीचे अध्यक्ष मयूर ढोले व संस्थेचे सर्व शिक्षक व संस्थेचे आजी व माजी प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

कायक्रमाचे सूत्रसंचालन प्रांजू देशमुख यांनी केले तर प्रास्ताविक डी. एम. डांगोरे यांनी केले तर पडोळे यांनी आभार व्यक्त केले.

कारंजात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन

कारंजा (घा.) ■ सिध्दार्थ सोमकुवर



कारंजा: वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभियान अंतर्गत कारंजा घाडगे येथील महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालय व बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेत भव्य ग्रंथ प्रदर्शनीचे व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यांत आले .जवळपास २०० विध्यार्थी आणी गावकऱ्यांनी ग्रंथप्रदर्शनी पाहिली ,तर १०० हून अधिक विध्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचा लाभ घेतला. तसेच सामूहिक वाचन उपक्रमात ७० विध्यार्थी सामील झालेत .या सर्व उपक्रमाबाबत पालकांनी कौतुक केले.

दिनांक १० जानेवारीला आयोजित ग्रंथ प्रदर्शनीचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते व नगरपंचायत चे सहयोगी सदस्य शिरीष भांगे यांनी केले .सदर प्रसंगी नगरपंचायत उपाध्यक्ष भगवान बुवाडे , शिक्षण सभापती सौ नीता मिश्रा नगरसेवक विशाल इंगळे आणि सामाजिक कार्यकर्ते दिलीप जसुत कर ,विनोद चाफले प्रमुख अतिथी म्हणून उपस्तीत होते ,वाचनालयाचे जनक स्वामी रंगनाथन व डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून पाहुण्यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले. नंतर प्रदर्शनी विद्यार्थाना पाहण्यास दोन दिवस उघडी ठेवण्यात आली .वाचनालयाचे सचिव अरुण फाळके यांनी ग्रंथ प्रदर्शनीचा उद्देश समजावून सांगितला .

११ जानेवारीला दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबीर व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा आयोजित करण्यांत आली. या कार्यशाळेचे उदघाटन नितीन दर्यापूरकर स्वीकृत सदस्य व माजी उपाध्यक्ष यांच्या हस्ते ,राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करून करण्यात आले .तर विविध स्पर्धा परीक्षा ची तयारी कशी करावी या बाबत सखोल व प्रभावी माहिती प्रमुख मार्गदर्शक रेडियन्स अकॅडमी वर्धा चे संचालक पंकज मानेकर यांनी केले तर व्यक्तिमत्व विकास कसा साधायचा संवाद कौशल्य कसे निर्माण करायचे, मुलाखती कश्या द्याव्यात या बाबतची शास्त्रशुद्ध माहिती व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षक माजी प्राचार्य रामचंद्र ठोंबरे नागपूर यांनी उपस्तीत विद्यार्थ्यांना दिली .नितीन दर्यापूरकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना प्रामाणिक पणे अभ्यास करण्याचे आवाहन केले व अभ्यासिकेतील त्रुटी त्वरित दूर करण्याचे आस्वासन दिले सावित्रीबाई फुले जयंतीचे औचित्य साधून ३ जानेवारीला वाचनालयाचे अध्यक्ष पी. पी .मोहोड व सचिव अरुण फाळके यांच्या मार्गदर्शनाखाली सामूहिक वाचन उपक्रम राबविण्यात आला ७० विध्यार्थी सहभागी झाले बोधकथा ,चरित्र सामान्य विज्ञान अशी पुस्तके वाचायला देण्यांत आली .

वाचनालयाचे सचिव अरुण फाळके यांनी आपल्या प्रस्ताविकातून वाचनालयाचे मार्फत राबवित असलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली.

रविकांत दळवी साई एम्ब्रॉसियाचे संचालक रविकांत दळवी यांनी उपस्तीत सर्वांचे आभार मानले. वाचनालयाचे पदाधिकारी धामसे सर ,बालाभाऊ मानकर पळसराम जसुतकर कार्यक्रमाला उपस्थित होते.

शिबिर आणि ग्रंथप्रदर्शनी च्या सफलते साठी साक्षी पाठे ,निकेश बारांगे व अभ्यासिकेतील सर्व विद्यार्थी ,ग्रंथपाल रमेश चाफले ,लिपिक अंजली जुनंनकार ,विजय बाराई यांनी सहकार्य केले .असेच उपयुक्त उपक्रम वाचनालया मार्फत राबविण्यात यावे अशी पालकांनी अपेक्ष्या केली.

पोकरा प्रशिक्षण विविध उपक्रमांतर्गत हळदीकुंकू कार्यक्रम संपन्न



वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : वर्धा येथील ग्रामोपयोगी विज्ञान केंद्रात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (टप्पा)-२ साठी जिल्ह्यातील निवडक ग्रामपंचायतींच्या सरपंचांचे प्रशिक्षण सुरू आहे. या अनुषंगाने सदर प्रशिक्षण कार्यक्रमात विविध उपक्रमा अंतर्गत महीला सरपंचांचा मकर संक्रांत निमित्ताने हळदी कुंकु कार्यक्रम नुकताच संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी यशदा च्या प्रशिक्षण सत्र समन्वयक प्रज्ञा विवेक चहांदे होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून यशदा च्या प्रविण प्रशिक्षक शारदा धनवीज आणि जेष्ट सरपंच मिराताई कनेरी होत्या.

यावेळी क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. महीला सरपंच महोदयांनी मकर संक्रांत निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. सोबतच मकर संक्रांत निमित्ताने सत्र समन्वयक प्रज्ञा चहांदे यांनी पेनाचे वाण दिले. प्रविण प्रशिक्षक शारदा धनवीज आणि सत्र सहाय्यक गायत्री झाडे यांनी महीला सरपंचांना हळदीकुंकू लावुन उखाणे घेतले.

यावेळी सविता कोलोकर, दुर्गा नैताम, नंदा चिंचुरकर, दिपाली कवारे, संगीता कदम, यांच्या सह असंख्य सरपंच महीला उपस्थित होत्या.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पुष्पा तावनकुरे, शालु मन्ने, अनुपमा नाचणे, डॉली मन्ने, इंदु मोहदे यांनी परीश्रम घेतले.

स्क्रीन आणि डोळ्यांवरील ताण ; काळजी घेण्याचे तज्ज्ञांचे आवाहन

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर



(पुणे) वाघोली : आजघडीला अनेकांचा दिवसातील जास्तीत जास्त वेळ स्क्रीनसमोर जातो. स्क्रिनमधून येणारा निळा प्रकाश हा डोळ्यांना अधिक नुकसान करतो. त्यामुळे डोळ्यांमध्ये दुखणे, खुपणे, डोळे लालसर होणे, डोळ्यात जळजळ होणे अशा अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.डोळ्यांच्या या समस्येला 'डिजिटल आय स्ट्रेन' असं म्हटलं जातं. डिजिटल आय स्ट्रेन आजकालच नाही, तर गेल्या काही वर्षांपासून गंभीर समस्या होत चालली आहे. काही अभ्यासकांच्या मते तर साधारणतः ५० टक्के लोकांमध्ये ही समस्या दिसून येते; पण या समस्येकडे दुर्लक्ष होते आहे.

एकदा ही समस्या बाढीला लागली की, याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. त्यासाठी कॉम्प्युटरसमोर काम करताना स्क्रीनचा उजेड कमी ठेवावा जेणेकरून डोळ्यांबर त्याचा परिणाम होणार नाही. उजेड जास्त असेल, तर डोळे सुकणे, ताण येणे, मान दुखणे यासारख्या समस्या भेडसावतात. त्यामुळे डोळ्यांचे नुकसानच होते.

डोळ्यांवरील ताण कमी होण्यासाठी काही डोळ्याचे व्यायाम करावेत. डोळे बंद करून आपल्या हातांच्या तळव्यांनी ते झाकून घ्यावेत. हलक्याने हात वरून खाली आणावेत. त्यामुळे डोळ्यांना आराम मिळतो. तसेच दर काही मिनिटांनी पापण्या मिचकावण्याची सवय लावा. यामुळे डोळ्यात योग्य तो दमटपणा राहतो आणि कोरड्या डोळ्यांची समस्या निर्माण होण्याची जोखीम कमी होते. तसेच डोळ्यांच्या पापण्या मिचकवल्याने डोळ्यांनाही आराम मिळतो. मांसपेशीवर पडणारा अतिरिक्त दबाव निघून जातो.डोळे चारही बाजूंना फिरवणे हा डोळ्यांसाठी उत्तम व्यायाम आहे. दहमिनिटांपर्यंत डोळे चारही बाजूला फिरवावेत. एकदा घड्याळयाच्या दिशेने तर एकदा विरुद्ध दिशेने फिरवावेत. त्यामुळे दृष्टी वाढते.चेहऱ्याला फेशियल किंवा संपूर्ण शरीराला मसाज करतोच; पण डोळ्यांना मसाज करण्यासाठी आवश्यकता असते. डोळ्यांचा मसाज करताना डोळे बंद करून बाहुल्यांच्या वर करावा. लहान बोटाचा वापर करून हा मसाज करावा. डोळ्यांना आराम आणि पोषण मिळण्यासाठी बदाम तेलाचा वापर करून मसाज करावा.

काम करताना अधूनमधून डोळ्यांना विश्रांती मिळायला हवी. कॉम्प्युटर स्क्रीनवर काम करत असताना दर दहा मिनिटांनी आपली नजर दुसरीकडे वळवा. जवळपास वीस फूट लांब असणारी वस्तू पाहण्याचा प्रयत्न करा. त्यामुळे डोळ्यांना आराम मिळतो.

- डॉ. सुजाता दिपके, वाघोली, पुणे.

योगा केल्याने दृष्टीत सुधारणा होते. शीर्षासन, अधोमुखाश्वानासन, सर्वांगासन, धनुरासन इत्यादी आसने केल्याने डोळ्यांना विश्रांती मिळतेच. त्यामुळे नियमित योगअभ्यास नक्कीच फायदेशीर ठरतो.

- डॉ. वृषाली शिंदे, चंदननगर, पुणे.

पौष्टीक आहार हा शरीराच्या तंदुरुस्तीसाठी आवश्यक असतो. आहारात अ जीवनसत्त्वाची कमतरता असल्यास दृष्टी कमी होते. अ जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे रातआंधळेपणाची समस्या भेडसावू शकते. त्यामुळे आहारात अ जीवनसत्त्वाचे प्रमाण अधिक असावे.

- डॉ. गीतांजली काळे, आनंद पार्क, वडगाव शेरी, पुणे.

आर्वी येथे मानवतेचे प्रचारक राज्यस्तरीय काव्य पुरस्कार वितरण व सत्कार सन्मान सोहळा

आर्वी ■ प्रतिनिधी



आर्वी:- सिध्दार्थ बुद्ध विहार डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर आर्वी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिवसाच्या अनुषंगाने मानवतेचे प्रचारक राज्यस्तरीय काव्य पुरस्कार वितरण व प्रतिभावंत कलाकारांचा व पत्रकारांचा सत्कार सन्मान सोहळा पार पडला.

या या कार्यक्रमाचे आयोजन मानवतेचे प्रचारक या बहुचर्चित कवितासंग्रहाचे कवी सुरेश भिवगडे यांनी केले होते. या कार्यक्रमाला प्रामुख्याने पूज्यनीय आचार्य भंते संजीव भंते बी आनंद .भंते करुणा किर्ती ज्येष्ठ धम्म प्रचारक मधुकररावजी गडलिंग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुजित दादा भिवगडे, अनिल तायडे, इत्यादी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

मानवतेचे प्रचारक या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी राज्यभरातून अनेक कवींचे कविता संग्रह प्राप्त झाले होते.

त्यातून १) रक्त फुलांचे ताटवे नोमेश नारायण २) मी वाट पाहतोय महेश वसंतराव कोंबे ३) आम्ही रानातली फुले विद्या दौलत सरपाते ४) दिपवलय दादाराव पाटील ५) आईसाहेब के. पाटील ६) पेटून उठा रे धर्मपाल मून इत्यादी कवितासंग्रहांना मानवतेचे प्रचारक राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

तसेच प्रतिभावंत कलाकारांचा सन्मान सोहळा सुद्धा याप्रसंगी पार पडला यामध्ये प्रतीक संगीता दिलीप कांबळे रॅप सॉंग, तन्वी बबनराव गवई नृत्यकलेसाठी, दीक्षा विजय सुखदेवे यांना समाजकार्यासाठी, दिव्यांशी दीपक साळवे हिला कवितेसाठी, मयूर राजेंद्र इंगळे सोशल मीडिया क्रिएटर, माननीय ज्येष्ठ पत्रकार सूर्यप्रकाश भट्टड यांना पत्रकारितेसाठी, सचिन मनवरे यांना गीत गायनासाठी गौरविण्यात आले.

याप्रसंगी भिमाची सावली रमाई माऊली हा एकपात्री नाट्य प्रयोग मीनाताई पाटील काठोल यांनी सादर केला, या कार्यक्रमाला साहित्य क्षेत्रातील साहित्यिक कवी विचारवंत धम्म प्रचारक व रील स्टार , सोशल मीडिया क्रिएटर यांची उपस्थिती होती. माननीय धम्म प्रचारक सुरेश भिवगडे यांचे जन्मदिनाचे औचित्य साधून मित्रपरिवारच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात महिला व पुरुषांची उपस्थिती होती.

तायवाडे महाविद्यालयातील विद्यार्थ्यीनी योगिता वानखेडे हिची २६ जानेवारी २०२५ च्या मुंबई परेडसाठी निवड



कोराडी ■ दिलीप येवले

कोराडी : श्री सच्चिदानंद शिक्षण संस्था, नागपूर, द्वारा संचालित तायवाडे महाविद्यालय, महादुला- कोराडी, येथील राष्ट्रीय सेवा योजनेची विद्यार्थीनी योगिता मोरेश्वर वानखेडे बी.एससी. द्वितीय वर्ष हीचे मुंबई रिपब्लिक डे २६ जानेवारी २०२५ रोजी मुंबई येथे होणाऱ्या परेडसाठी निवड झाली आहे.

योगिता वानखेडे ही वेलतुर पोस्ट वाकी, ता .सावनेर जि. नागपुर अशा ग्रामिण भागातील अतिशय लहान खेड्यातील एका शेतकरी कुटूंबातील मुलगी आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ, नागपुर येथुन तिन विद्यार्थ्यीनींची निवड झाली .त्यामध्ये योगिता वानखेडे ही एक आहे. तायवाडे महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.शरयू तायवाडे , राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.वकील शेख व इंग्रजी विभागप्रमुख डॉ.वर्षा वैद्य यांनी तिला पुष्पगूच्छ देवून प्रोत्साहित केले. राष्ट्रीय सेवा योजना सहकार्यक्रम अधिकारी डॉ. किशोर घोरमाडे, डॉ. गिरीश काटकर, समन्वयक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, डॉ. शरद डवरे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले.

देशमुखांच्या मारेकऱ्यांना लपविणाऱ्यांचाही हिशोब होईल; आरोपी संख्या पन्नासवर जाईल; खा.बजरंग सोनवणे यांची प्रतिक्रिया

केज ■ तात्या गवळी



केजः मस्साजोगचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांचा तपास सुरू आहे. दरम्यान, अपहरण करताना स्विफ्ट गाडी कोणाची होती?, मारेकऱ्यांना राहायला कोणी घरं दिली?, या सगळ्या गोष्टी तपासात स्पष्ट होतील. खंडणीमधील जे आरोपी होते ते कोणाच्या घरात होते, त्यांना कोणी गाड्या पुरवल्या हे सगळं समोर येईल आणि त्यांचाही हिशोब होईल. इतकेच नाही तर या प्रकरणात आरोपींची संख्या पन्नासवर जाईल, अशी प्रतिक्रिया खा.बजरंग सोनवणे यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

खा.बजरंग सोनावणे यांच्यावर संतोष देशमुख यांच्या खुनाशी संबधित असलेला आरोपी वाल्मिक कराड यांच्या पत्नीने वाल्मिक कराड यांना लोकसभा निवडणूकीनंतर जिवे मारण्याची धमकी दिली होती, असा आरोप केल्यानंतर माध्यमांशी बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, उभ्या आयुष्यात मी कधीही कोणाला धमकी दिली नाही. उलट लोकसभा निवडणूकीचा निकाल सुरू असताना बाहेर मलाच दमदाटी केल्याच्या खबरा पेरल्या गेल्या. त्यात काही लोकांनी स्वतची वाहवाही करून घेतली. मात्र, निकाल सुरू असताना असे काहीही झाले नव्हते. मी त्यावेळी धमकी दिली तर कराडताईंनी त्याच वेळेस का सांगितले नाही. आता सहा महिन्याने काहीही आरोप करण्याचे त्यांचे काम सुरू आहे. त्याबाबत फारसे न बोललेले बरे. दरम्यान, संतोष देशमुख यांचा क्रुरपणे खून करण्यात आला. ही घटना मावतेला काळीमा फासणारी घटना आहे. या प्रकरणाची व्याप्ती मोठी आहे.संतोष देशमुख यांचे अपहरण करताना स्विफ्ट गाडी कोणाची होती? मारेकऱ्यांना राहायला कोणी घरं दिली?, या सगळ्या गोष्टी तपासात स्पष्ट होतील. खंडणीमधील जे आरोपी होते ते कोणाच्या घरात होते, त्यांना कोणी गाड्या पुरवल्या हे सगळं समोर येईल. परळी बाहेरचा विषय खूप मोठा आहे. केजमध्ये गुंडांची प्रवृत्ती झालीय. इतर आरोपींनासुद्धा मकोका लावला पाहिजे ही आमची मागणी आहे. हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टमध्ये चालवायला हवे. ?डव्होकेट उज्वल निकम जर होकार देत नसतील तर सतीश मानेशिंदे या वकील महोदयांना हे प्रकरण द्या, असेही खा.बजरंग सोनावणे यांनी म्हटले.

जमावबंदी असताना आंदोलन कसे?

बीडमध्ये दि.१४ रोजी रात्री वाजेपासून जमावबंदी आदेश लागू करण्यात आले होते. असे असतानाही परळीत आंदोलन कसे झाले? हिंदू सणाच्या दिवशी गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी परळी बंद करण्याचा निर्णय घेतला. या प्रकरणी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट घेवून त्यांना सगळा वृत्तांत देणार आहे.

मुंडेच्या राजीनाम्याचा प्रश्न सरकारचा...

गुन्हेगाराला कुठलीही जात नसते. काही मूठभर समाजकंटक आहेत, ज्यांना जातीय रंग द्यायचा आहे. अजित पवारांनी बीडमध्ये पक्षाची कारवाई करताना थोडा उशीर केला का काय असं वाटतंय. संतोष देशमुख हत्येच्या संदर्भात जे-जे आहेत, जे कोणी सामील असेल या सर्वांना फाशी झाली पाहिजे. मी मागितला तर धनंजय मुंडे राजीनामा देणार आहेत का? तो सरकारचा प्रश्न आहे ते बघतील, असेही खा.बजरंग सोनावणे यांनी म्हटले आहे.

'शिक्षणातून माणुसकीची कला विकसित झाली पाहिजे' : सभापती संजय डांगोरे

काटोल ■ प्रशांत पवार



काटोल : शिक्षक प्रशिक्षण सभागृह येथे जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापकांची सहविचार सभा मोठ्या उत्साहात पार पडली. या सभेचे अध्यक्षस्थान काटोल पंचायत समितीचे सभापती संजय डांगोरे यांनी भूषवले, तर प्रमुख अतिथी म्हणून उपसभापती निशिकांत नागमोते, पंचायत समिती सदस्य अरुण उईके, पंचायत समिती सदस्या लताताई धारपुरे, गटशिक्षणाधिकारी जावेद इकबाल, तसेच केंद्रप्रमुख राजू धवड, रमेश गाढवे, आणि नीलकंठ लोहकरे उपस्थित होते.

सभापती संजय डांगोरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून शिक्षकांसमोर शिक्षणाची खरी भूमिका विशद केली. ते म्हणाले, 'विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे अत्यंत गरजेचे आहे. त्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता, चार भिंतींच्या बाहेरच्या जगाचा अनुभव घेण्यासाठी प्रोत्साहित करणे महत्त्वाचे आहे. भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी त्यांची तयारी करणे ही शिक्षकांची जबाबदारी आहे.'

त्यांनी शिक्षणाच्या वाढत्या उंचीबाबत समाधान व्यक्त करताना समाजात कमी होत चाललेल्या माणुसकीच्या उंचीबाबत खंत व्यक्त केली. 'शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये माणुसकीची कला विकसित झाली पाहिजे. समाजाचा विकास हा शिक्षणाच्या माध्यमातून शक्य असून, शिक्षकांचे कार्य गाव घडविण्याचे आहे,' असे त्यांनी ठामपणे सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात गटशिक्षणाधिकारी जावेद इकबाल यांच्या प्रास्ताविकाने झाली. राजेंद्र टेकाडे यांनी उत्तम प्रकारे कार्यक्रमाचे संचालन केले, तर राजू धवड यांनी आभार प्रदर्शन केले.

सभेत शिक्षकांनी विविध शैक्षणिक आव्हानांवर चर्चा करत नाविन्यपूर्ण दृष्टिकोन अवलंबण्याचा संकल्प केला. या सभेने शिक्षकांमध्ये नवीन उर्जा व प्रेरणा निर्माण केली.

हुतात्मा राष्ट्रीय कला व विज्ञान महाविद्यालय आष्टी येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत पुस्तक परीक्षण व कथन

आष्टी (शहीद) ■ प्रतिनिधी



आष्टी (शहीद):- येथील हुतात्मा राष्ट्रीय कला व विज्ञान महाविद्यालय आष्टी येथे महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे परिपत्रकानुसार महाविद्यालयात पुस्तकं परीक्षण व कथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेसाठी महाविद्यालयीन १९ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. महाविद्यालय ग्रंथालयातील उपलब्ध वाचन साहित्यापैकी विद्यार्थ्यांच्या आवडीचे पुस्तक विद्यार्थ्यांना देण्यात आले. त्यापैकी १९ विद्यार्थ्यांनीं केलेले पुस्तक परीक्षण महाविद्यालयीन ग्रंथपाल यांचेकडे सादर केलेत.

या स्पर्धेसाठी मुख्य परीक्षक म्हणून प्रा. डॉ. निलेश ए. ठाकरे (इंग्रजी विभाग प्रमुख) सोबतच प्रा. डॉ. प्रशांत डब्लू. धनविज (मराठी विभाग) होते. मंचावर महाविद्यालयीन प्राचार्या डॉ. सरिता एस. निमगरे, आय. क्यू. ए. सी. समन्वयक प्रा. राजेश ल. गुल्हाने, प्रा. डॉ. उज्वला व फुले व महाविद्यालयीन ग्रंथपाल प्रा. सुरेंद्र अवथरे उपस्थित होते.

सहभागी विद्यार्थ्यांच्या पुस्तक परीक्षण व कथन याचे परीक्षकांनी परीक्षण केलेत त्यात उत्कृष्ट असे तीन विद्यार्थ्यांना क्रमांक देण्यात आले. यात प्रथम क्रमांक. कु. आलिया परवीन शाह , द्वितीय क्रमांक तौसिया परवीन बिस्मिल्लाह खान तर तृतीय क्रमांक कु. वैष्णवी मदनकर यांना देण्यात आले.

प्रा. डॉ. निलेश या ठाकरे यांनी सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. व सर्व विद्यार्थ्यांनी नियमित वाचन करावे, वाचनामुळे आपले जीवन सफल होते त्याचबरोबर पुस्तक परीक्षनाचे स्पर्धा परीक्षांमध्ये, मुलाखत इत्यादींमध्ये होणारे फायदे विद्यार्थ्यांसमोर मांडले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. सुरेंद्र अवथरे यांनी व्यक्त केलेत. या कार्यक्रमाला महाविद्यालयीन प्राध्यापक डॉ. दीपक स्वर्गे, डॉ. तुषार नायकूजी, डॉ. विजय खाजोने, प्रा. सुमित काळपांडे उपस्थित होते त्याचबरोबर महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी व मोठ्या संख्येने महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी श्री. अरुण नेवाळे व शंतनू गवळी यांनी सहकार्य केले.

पुस्तक आणि झाड दिले संक्रातीचे वाण ; तीगावच्या सरपंच अर्चनाताई राज पाटील यांचा सामाजिक उपक्रम

बीड ■ गितांजली लव्हाळे



बीड वडवणी : लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष ?ड राज पाटील हे मागील २५ वर्षापासून सामाजिक क्षेत्रामध्ये नावाजलेले व्यक्तिमत्व आहे. त्यांनी आपल्या गावात एक अनोखी मकर संक्रात साजरी केली. या मकर संक्रातीला गावातील सुमारे ५०० महिलांना त्यांनी संक्रातीचे वाण दिल. या वाणामध्ये केवळ भेटवस्तूच नाही तर तिळगुळा सोबतच पुस्तक आणि एक झाड महिलांना भेट दिली. त्यांच्या या उपक्रमाचे संपूर्ण बीड जिल्ह्यात कौतुक होत आहे.

एडवोकेट राज पाटील हे मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे विश्वासू सहकारी आहेत. मराठा आरक्षण लढ्यामध्ये मागील चार वर्षापासून ते जरांगे पाटील यांच्यासोबत काम करत आहेत. लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या माध्यमातून तसेच वडवणी तालुका विकास समिती यासारख्या संघटनेचे नेतृत्व करत असताना मागील पंचवीस वर्षात राज पाटील यांनी सामाजिक क्षेत्रामध्ये खूप मोठे काम केले आहे. निसर्ग आणि मानवता या दोन गोष्टीची सांगड घालून त्यांनी नेहमी वृक्ष संवर्धन आणि वैचारिक देवाण घेऊन यावर भर दिला आहे. त्यांनी आतापर्यंत बीड जिल्ह्या आणि जिल्ह्याबाहेर देखील लाखो झाडांची लागवड केली आहे. आतापर्यंत त्यांनी लाखो लोकांना माता जिजाऊ, छत्रपती शिवराय, छत्रपती संभाजी महाराज, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई, माता अहिल्याबाई, माता फातिमा, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, स्वामी विवेकानंद यासारख्या महान व्यक्तींचे चरित्रांचे पुस्तके वाटलेले आहेत. एवढेच नाही तर संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, तुकडोजी महाराज, गाडगेबाबा यासारख्या संतांचे विचार घराघरात पोहोचविणारे ग्रंथ देखील त्यांनी सांप्रदायिक क्षेत्रामध्ये वाटलेले आहेत. मकर मकर संक्रांतीच्या शुभ सण त्यांनी अनोख्या पद्धतीने साजरा करण्याचा पायंडाच आपल्या गावात पाडला आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी त्यांनी आपल्या गावात मकर संक्रांतीच्या सणाच्या निमित्ताने तिळगुळ आणि भेटवस्तू सोबतच झाडे आणि महापुरुष, संतांचे विचाराचे पुस्तके गावातील मातामावल्यांना वाटले. या संक्रातीच्या निमित्ताने गावातील शांतता सुख समाधान आणि भरभराटी टिकून राहावी आणि एकोपा जर राहिला तर गाव यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास एडवोकेट राज पाटील यांनी व्यक्त केला. त्यांच्या पत्नी सौ. अर्चना राज पाटील विद्यमान सरपंच आहेत आपल्या पतीच्या सामाजिक कार्याला त्यांचा खूप मोठा हातभार आहे. गावाचा विकास आणि निसर्ग संवर्धन हे पतीचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी मेहनत घेत असल्याचे एडवोकेट राज पाटील यांच्या पत्नीं सौ अर्चना पाटील यांनी सांगितले.

गावातल्या प्रत्येक महिलेच्या सन्मानासाठी प्रयत्न करणार

मी तीगावची सरपंच असले तरी गावातील सर्व सामान्य माता माऊल्या माझ्या मार्गदर्शक आहेत. मी सर्व महिलांचा सन्मान करूनच गावाचा कारभार करत आहे. या गावातील प्रत्येक महिलेचे विचार आणि स्वातंत्र्य अबाधित राहण्यासाठी मी प्रयत्न करत आहे. कोणत्याही महिलेला त्याच्या हक्क आणि अधिकारापासून दूर ठेवले जाणार नाही याची काळजी मी घेत आहे. गावातील सर्व महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. प्रत्येक महिलेच्या घराघरात महापुरुषांचे विचार गेले पाहिजेत जिजाऊ, सावित्रीबाई, रमाई, अहिल्याबाई, फातिमा, संत जनाबाई, संत ज्ञानेश्वर, तुकोबाराय यांचे विचार घराघरात पोचविण्यासाठी महिलांना आवश्यक आहे ते सर्व साहित्य मी पुरवणार असल्याचे सरपंच अर्चनाताई राज पाटील यांनी व्यक्त सांगितले.

जिल्हा क्रिडा संकुल येथे राज्य क्रिडा दिन साजरा

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा :ऑलिंपिकवीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा १५ जानेवारी हा दिवस राज्य क्रिडा दिन म्हणुन साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून जिल्हा क्रिडा संकुल येथे विविध खेळाचे प्रदर्शनीय सामन्यांचे आयोजन करुन क्रिडा दिन साजरा करण्यात आला.

यावेळी प्रियदर्शनी महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सोनाली शिरभाते- सुर्यवंशी, जिल्हा क्रिडा अधिकारी आशा मेश्राम, राज्य क्रिडा मार्गदर्शक किशोर बोंडे यांच्या हस्ते राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत प्राविण्य प्राप्त तसेच सहभाग नोंदविलेले राष्ट्रीय खेळाडू यामध्ये लुधीयाना पंजाब येथे झालेल्या राष्ट्रीय शालेय कराटे स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केल्या मानसी गाठे, तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या पियुष हवलदार यांचा तसेच जिल्ह्यातील २५ राष्ट्रीय खेळाडूंना सन्माचिन्ह, पदक व खाशाबा जाधव यांचे जीवनचरीत्र असलेले पुस्तक देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन क्रिडा अधिकारी संदीप खोब्रागडे यांनी केले तर आभार अनिल निमगडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भोजराज चौधरी, विश्वास बोकडे, रवी काकडे, अविनाश देसाई, रुचिका टेंभरे, वर्षा चंदनखेडे, वर्षा चंदनखेडे, अशोक पेढेकर यांनी परिश्रम घेतले.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242